# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२६

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**मंगळवार, दिनांक ३० जून, २०२६ / आषाढ ९, १९४८ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उप मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** | |
| **(३)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | |
| **(४)** | **अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५५**

---

### राज्यात बनावट इंजेक्शनस् व औषधांची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१) * ८९३५ श्री.श्रीकांत भारतीय, श्री.विक्रांत पाटील, श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बनावट इंजेक्शनस् (अल्ब्युरेल / इतर औषधे) तयार करून त्याची विक्री मोठ्या प्रमाणात होत असून या प्रकरणाचा संबंध इतर राज्यांतील कंपन्या व औषध वितरकांशी असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात बनावट इंजेक्शनस् चा मोठा साठा हस्तगत केला असून त्याचे उत्पादन चंदीगड मध्ये होत असून विक्री महाराष्ट्रात सुरू असल्याचे अन्न व औषध प्रशासन विभागाच्या तपासात निदर्शनास आले असून या प्रकरणाचा संबंध इतर राज्यांतील कंपन्या व औषध वितरकांशी असल्याचे वृत्त प्रसिध्द झाले आहे, त्याचा जिल्हानिहाय तपशील काय आहे,

(३) असल्यास, पुणे एफडीएने अलीकडे जीवनरक्षक बनावट अल्ब्युरेल औषधांचा पर्दाफाश केला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आली असून, सदर कारवाईत किती प्रकारची आणि किती प्रमाणात बनावट औषधे जप्त करण्यात आली आहेत तसेच सदर बनावट औषधांची कोणत्या बाजारपेठेत किंवा वितरकांच्या माध्यमातून विक्री केली जात होती, या प्रकरणात आतापर्यंत किती आरोपींवर कारवाई करण्यात आली आहे व त्याचा तपशील काय आहे,

(४) असल्यास, रिलायन्स लाईफ केअर या नावाखाली अल्ब्युरेल इंजेक्शनची निर्मिती चंदीगड मधील एका औषध कंपनीत करून ती राज्यामध्ये वितरित केली जात होती, या तपासात मेसर्स हितोशी फार्मास्युटिकल्स या कंपनीकडून हा माल पुरविला गेल्याचे आणि देयकाविना उक्त खरेदी-विक्री होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील बनावट इंजेक्शनमुळे झालेल्या परिणामांची तपासणी करण्यात आली आहे काय, संबंधित कंपन्या, वितरक व दलाल यांच्यावर आतापर्यंत कोणती कारवाई करण्यात आली आहे,

किती जणांना अटक करण्यात आली आहे, असल्यास त्याच्या अहवालात काय नमूद करण्यात आले आहे,

(६) असल्यास, राज्यातील औषध तपासणी यंत्रणेने याबाबत विशेष मोहीम राबवून बनावट औषधांची विक्री रोखण्यासाठी संबंधित औषध कंपन्या/घाऊक विक्रेत्यांवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच भविष्यात बनावट जीवनरक्षक औषधांचा पुरवठा करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली व त्याबाबत काय उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१), (२), (३), (४), (५) व (६) हे खरे आहे.

अन्न व औषध प्रशासनाने में. मैत्री फार्मास्युटिकल्स, पुणे या होलसेल औषध आस्थापनाची दिनांक २८/०७/२०२५ व दिनांक ०१/०८/२०२५ रोजी तपासणी केली. सदर तपासणीवेळी घेण्यात आलेला Albural २० mg Injection B.No.AN२०७२५०६९, MFG BY. M/s Reliance Life Science Pvt. Ltd या औषधाचा नमुना अहवाल क्र.NSO /MUM/१५००२६/२०२६, दिनांक ०२/०२/२०२६ रोजी प्राप्त झाला असून सदर औषध बनावट घोषीत झाले आहे.

सदर प्रकरणी चौकशी केली असता, मे. मैत्री फार्मास्युटिकल्स, सदाशिव पेठ, पुणे यांनी सदर औषध मे. श्री.साई लॉजीस्टीका खडगाव रोड, वाडी, नागपूर येथून खरेदी केले होते. तसेच, मे.श्री.साई लॉजीस्टीका खडगाव रोड, वाडी, नागपूर यांनी सदर साठा M/s. Nexus Lifecare Pvt Ltd, Mumbai व M/s. NRX Distributors LLP, चुनाभटटी, सायन, मुंबई यांचेकडून खरेदी केला होता.

तसेच, संशयावरुन मे. श्रीराम हेल्थकेअर, पुणे येथून देखील Alburel (Human Normal Albumin IP) १००ml, B.No. AN२०७२५०७७ उत्पादक मे. रिलाईन्स लाईफ सायन्सेस नाशिक प्रा. लि. नाशिक या औषधांचे नमुने घेतले. मे. श्रीराम हेल्थकेअर यांनी या औषधाची खरेदी मे. आर. एस. एल. फार्मा, सदाशिव पेठ, पुणे येथून केली होती. मे. आर. एस. एल. फार्मा, सदाशिव पेठ, पुणे येथे सदर औषधाचा B.No. AN२०७२५०८४ चा एकूण ३९ बॉटल्स चा साठा आढळला असून दिनांक १२/११/२०२५ रोजी सदर बनावट औषघांचा रुपये ४,१९, २४५/- किंमतीचा साठा जप्त करण्यात आला. सदर औषधाची खरेदी मे.श्रीराम हेल्थकेअर, पुणे यांनी मे. NRX Distributors LLP, सायन, मुंबई व मे. RRT फार्मा, कामोठे, नवी मुंबई यांचे कडून केल्याचे उघड झाले.

या प्रकरणी M/s. Nexus Lifecare Pvt Ltd, Naigaon Cross RD, Dadar (E), Mumbai या पेढीची दिनांक ०२/०२/२०२६ रोजी व M/s. NRX Distributors LLP, चुनाभटटी सायन, मुंबई या पेढीची दिनांक ०४/०२/२०२६ रोजी तपासणी करण्यात आली. सदर दोन्ही पेढयांनी बनावट औषधांचा साठा M/s RRT Pharma, Kamothe, Dist- Raigad यांच्याकडून खरेदी केली असल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार, दिनांक १३/०९/२०२५ व दिनांक १५/०९/२०२५ रोजी अन्न व औषध प्रशासनाने M/s RRT Pharma, Kamothe, नवी मुंबई येथे तपासणी केली. तेव्हा सदर पेढी मालक यांनी सदर औषधांचा खरेदी-विक्री तपशील उपलब्ध केला नाही. चौकशीअंती त्यांनी सदर औषधे दानिश खान राहणार दिल्ली यांचेकडून विना खरेदी बिलाने खरेदी केले असल्याचे सांगितले. तसेच, दानिश खान यांनी सदर औषधे श्री.राजकुमार मिश्रा राहणार चंदिगड, पंजाब यांच्याकडून कॅश स्वरुपात विना बिल खरेदी केले असल्याचे सांगितले. सदर प्रकरणी पुणे पोलीसांनी संबंधित आरोपीं विरुध्द भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम

३१८ (४), ३३६ (३), ३४०(२), २७८, ६०, व ३(५) च्या अंतर्गत प्रथम खबर अहवाल क्रमांक ०१८२/२०२५, दिनांक १६/०९/२०२५ व प्रथम खबर अहवाल क्र.००३५/२०२६, दिनांक २७/०२/२०२६ नोंदविला आहे. संबंधित आरोपींना कामोठे येथून चौकशी करीता ताब्यात घेतले असून त्यांना मा.न्यायालयाने पाच दिवसाची कोठडी सुनावलेली होती.

नागपूर येथे अन्न व औषध प्रशासनाने दिनांक १८/०९/२०२५ रोजी मे. हितांशी फार्मास्युटीकल्स, नागपुर या पेढीच्या तपासणीवेळी पेढीमधून "Alburel (Alburel Injection २०%)" B.No.AN२०७२५०७७, Mfg Dt- JUN २०२५, उत्पादक Reliance Life Science Nashik Pvt. Ltd. Nashik या औषधाचा नमुना घेतला. सदर नमुन्याचा अहवाल दिनांक १५/१०/२०२५ रोजी प्राप्त झाला असून तो शासकीय विश्लेषक, मुंबई यांनी बनावट असल्याचे घोषित केले. मे. हितांशी फार्मास्युटीकल्स, नागपुर यांनी सदरचा बनावट औषधसाठा M/s. NRNxt Distributors LLP, Sion, Mumbai यांचेकडून खरेदी केला असल्याचे कळविले आहे. M/s. NRNxt Distributors LLP, Sion, Mumbai यांनी सदर औषधाची खरेदी M/s. NR Distributors, Hyderabad, TELANGANA यांचेकडून केली आहे. M/s. NR Distributors, Hyderabad, TELANGANA यांनी सदरचा बनावट घोषित औषध साठा M/s. RRT Pharma, Kamothe, Navi Mumbai यांचेकडून खरेदी केला असल्याचे निष्पन्न झाले. M/s. RRT Pharma, Kamothe, Navi Mumbai या पेढीने वर नमुद औषधाची खरेदी विना बिलाने दानिश खान, दिल्ली यांचेकडून केली. दानीश खान याने सदर बनावट औषधी राजू कुमार मिश्रा, चंदीगढ यांचेकडून घेतली होती.

सदर प्रकरणी बनावट औषधाचे उत्पादन कोणी केले व कोठे केले याचा सखेल तपास होण्यासाठी संबंधित पेढ्यांविरुध्द व व्यक्तींविरुध्द भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ मधील कलम ३१८(४), ३३६(३), ३४०(२), २७८, ६०, ३(५) अंतर्गत शांती नगर पोलीस स्टेशन, नागपुर येथे प्रथम खबर अहवाल क्रमांक ८९/२०२६ दिनांक २३/०४/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

M/s Reliance Life Science Pvt. Ltd, नाशिक यांनी दिनांक ०९/०१/२०२६ रोजीच्या पत्रान्वये सदर औषधाचे उत्पादन केले नसल्याचे स्पष्ट केले आहे.

सदर बनावट औषध विक्री प्रकरणाचा सखोल तपास करण्यात आला असून, तपासादरम्यान बनावट औषधांच्या विक्री व वितरणामध्ये सहभागी असल्याचे आढळून आलेल्या इतर २५ औषध विक्रेत्यांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. तसेच, या प्रकरणी मा.पुणे सत्र न्यायालय येथे खटला क्र. ४३५४/२०२६ दिनांक २६/०५/२०२६ रोजी दाखल करण्यात आला असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

राज्यातही अन्न व औषध प्रशासनामार्फत वरीलप्रमाणे औषध विक्री साखळीवर नियमित देखरेख ठेवून बनावट जीवनरक्षक औषधांचे साठवणूक, वितरण व विक्री यांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष तपास मोहीमा, नमुना संकलन, छापे, जप्ती व खटले दाखल करण्याची कार्यवाही सातत्याने करण्यात येते.

तसेच, (GSR ८२३ (E), दिनांक १७/११/२०२२ नुसार नियमातील अनुसुची H२ मधील औषधांच्या पाठांना प्रायमरी पॅकेजींगवर औषधांच्या असलेबाबत पडताळणी करणेस्तव औषधांच्या पाठांच्या लेबलवर QR Code नमुद करणे औषधे व सौंदर्य प्रसाधने नियम, १९४५ मधील नियम ९६ (६) नुसार अनिवार्य आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील दिनदयाळ अंत्योदय योजनेंतर्गत काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांची देयके प्रलंबित असल्याबाबत

**(२) * ९२०९ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व नगरपालिकांमध्ये सन २०१३ मध्ये सुरु करण्यात आलेली दिनदयाळ अंत्योदय योजना (National Urban Livelihoods Mission) दिनांक ३० सप्टेंबर, २०२४ रोजी बंद करण्यात आली असून, सदर योजनेंतर्गत काम करणाऱ्या शेकडो स्वयंसेवी संस्थाची देयके अद्याप प्रलंबित असल्याची बाब माहे मार्च, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेंतर्गत काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांची देयके प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत, तसेच शासनाने निश्चित कालमर्यादा ठरवून संबंधित संस्थांची थकीत देयके तातडीने अदा करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) केंद्र पुरस्कृत दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान राबविण्यासाठी केंद्र हिस्सा ६० टक्के व समरुप राज्य हिस्सा ४० टक्के याप्रमाणे निधीची तरतूद होती. सदर अभियान हे दिनांक ३० सप्टेंबर, २०२४ रोजी संपुष्टात आले असून निधी अभावी स्वयंसेवी संस्थांची देयके प्रलंबित आहेत, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, राज्य अभियान संचालक, दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान तथा आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांच्यामार्फत केंद्र शासनाकडे निधीच्या मागणीकरीता पत्राव्दारे पाठपुरावा सुरु असून सदर निधी प्राप्त झाल्यानंतर प्रलंबित देयके अदा करण्यासंदर्भातील पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील पाषाण येथील सांडपाणी शुध्दीकरण प्रकल्पांतर्गत पाण्याचे पुरेसे शुध्दीकरण होत नसल्याबाबत

**(३) * ८८३८ श्री.योगेश टिळेकर, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील औंध-पाषाण-सुतारवाडी येथील पाषाण तलावामागे सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प उभारण्यात आला असून, सदर प्रकल्पात अनेक त्रुटी असल्याने पाण्याचे पुरेसे शुद्धीकरण होत नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे महानगरपालिकेने पाषाण तलावासाठी उभारलेला एसटीपी प्रकल्प बंद असतानाही तेथे १४१ एमएलडी पाणी शुध्द केले म्हणून बंद प्रकल्पाच्या देखभाल दुरुस्ती खर्चाची देयके सादर केली असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तलावात १५ ते १५ एमएलडी पाणी येत असताना प्रत्यक्षात मात्र १ एमएलडी क्षमतेचा प्रकल्प उभारण्यात आला असून, या प्रकल्पाचे काम माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये पूर्ण होऊनही अद्याप महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाची मान्यता मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत सांडपाणी प्रक्रिया आणि पुनर्वापरास प्रोत्साहन देण्यासाठी उभारण्यात आलेले खासगी सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत महानगरपालिकेकडून सातत्याने पाठपुरावा व कार्यवाही करण्यात येत आहे काय,
(५) असल्यास, सदर एसटीपी प्रकल्पाची क्षमता वाढवून या परिसरातील सांडपाणी शुध्द करून प्रकल्पातील सर्व त्रुटी दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) होय, हे खरे आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरात एकूण ४९४ खाजगी मैलाशुद्धीकरण केंद्रे असून त्यातील ३६८ मैलाशुद्धीकरण केंद्रे कार्यान्वित आहेत. कार्यान्वित नसलेल्या १२६ सोसायट्यांमधील मैलाशुद्धीकरण केंद्रे कार्यान्वित करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत कार्यवाही सुरु आहे.
(५) पाषाण येथील १ एमएलडी क्षमतेच्या प्रकल्पाची ठिकाणी एसटीपी प्रकल्पाची क्षमता वाढविण्यासाठी जागा उपलब्ध नाही. तथापि, पुणे महानगरपालिका हद्दीतील प्रकल्पाचे क्षमतेपेक्षा जास्त येणारे मैलापाणी बंदिस्त मलवाहिनीव्दारे तलावाचे खालील बाजूस नेवून भविष्यामध्ये त्यावर प्रक्रिया करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. तसेच, पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील मैलाशुद्धीकरण केंद्रे कायमस्वरुपी कार्यान्वित राहण्यासाठी महानगरपालिकेमार्फत सोसायट्यांना तांत्रिक सहाय्य करण्यात येत असून मैलाशुद्धीकरण केंद्रे कार्यान्वित नसल्यास महानगरपालिकेमार्फत अशा सोसायट्यांना नोटीसा बजावण्यात येत आहेत. तसेच, प्रथम, द्वितीय व अंतिम नोटीस बजावून देखील मैलाशुद्धीकरण केंद्रे कार्यान्वित नसल्यास UDCPR नियमावलीनुसार अशा सोसायट्यांचे नळ कनेक्शन खंडित करण्याची कार्यवाही करण्यात येते.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरास अनियमित व दूषित पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(४) * ८७४५ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरात पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी असलेल्या ओ.सी. डब्ल्यु कंपनीकडून अनियमित व दूषित पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असल्याची बाब माहे एप्रिल,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे २५ हजारांहून अधिक नागरीकांना वाढीव पाण्याची देयके पाठविण्यात आली असून पाणी पुरवठ्याच्या करारातील नियमांचे पालन न केल्याबद्दल कंपनीकडून दर महिन्याला रुपये ३.५० कोटी या प्रमाणे रुपये ७.०० कोटीचा दंड वसूल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत परिसरातील नागरिकांनी वारंवार ओ.सी.डब्ल्यु कंपनीकडे तक्रार करूनही समस्यांचे निराकरण होत नसून या दूषित पाणी पुरवठ्यामुळे परिसरात रोगराई पसरण्याची शक्यता निर्माण झाली असून, उक्त कंपनीने सदर समस्येची तातडीने दखल घेऊन निराकरण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

नागपूर शहरातील काही भागात माहे एप्रिल, २०२६ मध्ये अनियमित व दूषित पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत्या.
(२) हे खरे आहे.

ओ.सी.डब्ल्यु. कंपनीकडून सप्टेंबर, २०२५ ते मार्च, २०२६ या कालावधीत करारनाम्यानुसार सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता न घेता नागरिकांना सरासरीपेक्षा जास्त देयके तामील करण्यात आली. तथापि, महानगरपालिकेने सदर देयके त्वरीत मागे घेण्याचे निर्देश दिल्यानंतर ती रद्द करण्यात आली. सुधारीत देयके सादर होईपर्यंत कंपनीची रुपये १०.३५ कोटी रक्कम महानगरपालिकेद्वारे थकित ठेवण्यात आली होती. सुधारीत देयके दिल्यानंतर थकित रक्कम कंपनीस परत देण्यात आली.
(३) दूषित पाण्याबाबत तक्रार प्राप्त होताच प्रभावित परिसर वेगळा (Isolate) करण्यात येतो. बाधित क्षेत्रातील व पाईप लाईन द्वारे होणारा पाणीपुरवठा बंद करुन टँकर्स द्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो. परिसर वेगळा झाल्यानंतर प्रभावित जलवाहिनीमध्ये कॅमेरा टाकून जलवाहिनीमध्ये गळतीचा शोध घेण्यात येतो तसेच दूषित पाण्याचा स्रोत निश्चित करुन तो बंद करण्यात येतो. आवश्यकता असल्यास जूनी जलवाहिनी बदलून घेण्यात येते. एप्रिल, २०२६ मध्ये अनियमित व दूषित पाणीपुरवठ्याबाबत प्राप्त तक्रारीचे महानगरपालिकेद्वारे तात्काळ निवारण करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक येथील आगामी कुंभमेळ्यासाठी विविध विकासकामांना सविस्तर प्रकल्प अहवालाअभावी प्रशासकीय मंजुरी दिल्याबाबत

**(५) * ९६२१ श्री.सत्यजीत तांबे, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथे होणाऱ्या आगामी कुंभमेळ्यासाठी विविध विकासकामांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार नसताना त्यांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली असून, नाशिक शहरात रस्ते रुंदीकरण, नवीन रस्ते आणि रिंग रोड अशा विविध प्रकल्पांमधील ५७ हून अधिक रस्त्यांची कामे भूसंपादनामुळे प्रलंबित असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सविस्तर प्रकल्प अहवालातील किती कामांना मंजुरी देण्यात आली आहे तसेच मंजुरी देण्यात आलेल्या कामांची एकूण अंदाजित किंमत किती आहे तसेच सविस्तर प्रकल्प अहवालाशिवाय

प्रकल्पांना मंजुरी देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, जमीन मालकांना टीडीआरऐवजी (हस्तांतरणीय विकास हक्क) बाजारभावाप्रमाणे रोख रकमेची अपेक्षा असल्यामुळे भूसंपादन प्रक्रियेत अडचणी निर्माण होऊन नियोजित कामांमध्ये समस्या निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यामुळे ९० टक्क्यांपर्यंत पूर्ण झालेल्या रस्त्यांचा वापर करता येत नसल्यामुळे शहरात वाहतूक कोंडी निर्माण होत आहे तसेच शासकीय निधीचा अपव्यय होत असून गंगापूर रोड ते मखमलाबाद, सातपूर ते सिडको आणि इंदिरानगर ते पाथर्डी फाटा यांसारख्या महत्त्वाच्या ३५ रस्त्यांची कामे अपूर्ण असल्याने वाहनधारकांना व भाविकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कुंभमेळ्याकरीता येणाऱ्या भाविकांना तसेच नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी अपूर्णावस्थेतील रस्त्यांची कामे लवकर पूर्ण करण्यासाठी तसेच उक्त सर्व कामांकरीता रुपये १२०० कोटींचा निधी तात्काळ उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, नाशिक येथील कुंभमेळ्यासाठी विविध विकासकामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली असून सदर कामांसाठी आवश्यक असलेला सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार न करता किंवा अपूर्णावस्थेत असताना मंजुरी देण्यात आल्याने या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

नाशिक महानगरपालिका कार्यान्वित यंत्रणा असलेल्या रस्ते व पुलाच्या एकूण ३६ कामांना रुपये १४४९.३७ कोटी रकमेची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळा (MSIDC) कडून द्वारका सर्कलचे काम (रुपये २१४ कोटी) तसेच नाशिक रिंग रोड भूसंपादनाचे काम प्रगतीपथावर आहे.

सदर प्रकल्पांचे DPR तयार करुन नियमानुसार तांत्रिक मंजुरी प्राप्त करुन घेतल्यानंतर प्रकल्पांना मंजूरी देण्यात आली आहे.

(३) अंशत: खरे आहे.

दिनांक ०५ जून, २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये कुंभमेळा आयुक्त, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण, नाशिक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार, नाशिक महानगरपालिकेकडून साधुग्राम प्रकल्पाकरीता आरक्षित करण्यात आलेल्या १९१.२१ एकर जमिनीचे भूसंपादन करणेकरीता रुपये २२६७ कोटी इतकी रक्कम नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणास उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(४) अंशत: खरे आहे.

आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहरामध्ये महापालिकेकडून ३५ रस्त्यांचे कामांना मान्यता देण्यात आली असून सदर मंजूर रस्त्यांमधील काही रस्ते दुरुस्ती कामकाज हे तातडीने पूर्ण करण्याच्या उद्देशाने सुरु आहेत. त्यामुळे सदरील रस्त्यांवरील वाहतूक ही पर्यायी मार्गानी वळविण्यात येवुन वाहतूक नियमन करण्याकरीता शहर वाहतूक शाखेकडील अधिकारी व अंमलदार तसेच नाशिक

महानगरपालिकेकडून मंजूर करण्यात आलेले ट्रॅफिक वार्डन यांचे मार्फत वाहतूक नियमन करण्यात येत आहे.
(५) सदर कामांकरीता नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण, नाशिक यांनी मागणी केल्याप्रमाणे शासन स्तरावरुन आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्याची तजवीज करण्यात येत आहे.
(६) सिंहस्थ कुंभमेळा-२०२७ च्या अनुषंगाने नाशिक शहरातील विविध विकासाची कामे हाती घेण्यात येत आहेत. सदर कामांसाठी सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने तज्ञ सल्लागार (Consultant) नियुक्त करण्यात आले असून त्यांच्या मार्फत आवश्यक सर्वेक्षण, आराखडे, प्राकलने व सविस्तर अहवाल (DPR) नियमानुसार तांत्रिक मंजूरी प्राप्त केल्यानंतर संबंधित यंत्रणेकडून सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाकडे मंजूरीसाठी सादर करण्यात येतात. तदनंतर प्राधिकरणाकडून सदर कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात येतात.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माणगाव (जि.रायगड) शहरातील क्रीडा संकुलाची दुरवस्था झाल्याबाबत

**(६) * ९६९९ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ, श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माणगाव (जि.रायगड) शहरातील क्रीडा संकुलाची दुरवस्था झाली असून सदर संकुलात खेळांडूसाठी नवीन क्रीडा साहित्याचा अभाव असल्यामुळे खेळाडूंमध्ये नाराजीची भावना निर्माण झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, क्रीडा संकुलातील खेळांचे आणि व्यायामाचे साहित्य मोडकळीस आले असून काही साहित्य अडगळीत तसेच भंगारात पडले असून उक्त इमारत ठिकठिकाणी तडकलेली, गळती लागलेली आणि असुरक्षित स्थितीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खेळाडूंमध्ये क्षमता असूनही अपुरे क्रीडा साहित्य, इमारतीची दुरवस्था या कारणांमुळे खेळाडूना सराव करता येत नाही तसेच क्षमता असूनही आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू घडले जात नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रायगड जिल्ह्यातील युवा खेळाडू व क्रीडा संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी तसेच ऑलिम्पिकमध्ये आपले खेळाडू जावे याकरीता उपलब्ध मैदाने सुस्थितीत असणे ही काळाची गरज असल्याने सदर क्रीडा संकुलाची दुरुस्ती, सुरक्षितता सुनिश्चित करणे व नवीन साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी तसेच उक्त कामांसाठी तातडीने निधी मंजूर करावा याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार :** (१) अंशत: खरे आहे.

सन २०२० मध्ये वादळी वाऱ्याने सदर संकुलाच्या बहुउद्देशिय हॉलचे पत्रे उडून गेले होते. त्याची उपलब्ध निधीतून दुरूस्ती करण्यात आली होती.

(२), (३) व (४) संकुलामध्ये क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी दिनांक २१/०६/२०२४ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून रुपये २०० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. त्याअंतर्गत बॅडमिंटन हॉल दुरुस्ती, शौचालय दुरुस्ती, दरवाजे, खिडक्या, गेट दुरुस्ती, रंगकाम, दुमजली बहुद्देशिय हॉल, आर्चरी शेड, पाणीपुरवठा पाईप लाईन, २०० मी धावन मार्ग भराव इ. कामे हाती घेण्यात येणार आहेत. तसेच क्रीडा साहित्यासाठी तरतुद करण्यात आलेली आहे.

यासाठी वास्तुविशारद /प्रकल्प व्यवस्थापक यांची नियुक्ती करण्यात आली असून लवकरच कामे हाती घेण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवीन नागपूर प्रकल्प कार्यान्वित झाला नसल्याबाबत

**(७) * ९१४८ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाडगाव रिठी व गोधनी रिठी (ता.हिंगणा, जि.नागपूर) येथील सुमारे १,७१० एकर सुपीक जमीन 'नवीन नागपूर' प्रकल्पासाठी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने आरक्षित केली असून, सदर प्रकल्प अद्यापही कार्यान्वित न झाल्याची बाब माहे मार्च, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत सहा महिन्यांपासून बाधित शेतकऱ्यांना प्रकल्पाबाबत कोणतीही अधिकृत व ठोस माहिती दिली जात नसल्यामुळे त्यांच्यामध्ये संभ्रम व नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे तसेच प्रशासकीय दिरंगाईमुळे शासनाच्या पारदर्शकतेच्या नियमांचे उल्लंघनही होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जमिनीची मोजणी, विहीर व झाडांचे सर्वेक्षण पूर्ण झाले असूनही पुढील कार्यवाही व योग्य मोबदला देण्याबाबतचा निर्णय न झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या उपजीविकेचा व शेतीच्या मशागतीचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मोबदला वाटप प्रक्रियेत सुसूत्रता आणण्यासाठी काही सुधारणा केल्या आहेत काय तसेच बाधित शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी व प्रकल्प विनाविलंब सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व २) खरे नाही.

(३), (४) व (५) नागपूर महानगर क्षेत्रातील मौजा- गोधनी (रिठी) व मौजा-लाडगाव (रिठी), तह. हिंगणा, जि.नागपूर या ठिकाणाचे अंदाजे ६९२.०६ हे आर. क्षेत्रातील नविन नागपूर हे (International Business and Fiancial Centre (IBFC)) म्हणून विकसीत करण्यासाठी महत्वकांक्षी प्रकल्प राबविण्यास दिनांक १०/०९/२०२५ रोजी राज्य शासनाने मान्यता दिली आहे. त्यानुषंगाने सदर प्रकल्प विकसित करण्याच्या अनुषंगाने भूसंपादनाची प्रक्रिया प्राधिकरण स्तरावर सुरु आहे.

-----------------

## पुणे शहरातील वृक्षगणनेच्या कामाच्या कंत्राट प्रकरणी चौकशी करण्याबाबत

**(८) * ९०५४ श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेने सन २०१६ मध्ये मिळकतींच्या जीआयएस मॅपिंगचे काम संबंधित कंपनीला दिले परंतु, या कंपनीने मिळकत कराच्या कामात ८८ टक्के चुका केल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली असतानाही पुन्हा त्याच कंपनीला पुणे शहरातील वृक्षगणनेचे रुपये ३० कोटी एवढ्या रकमेचे कंत्राट दिल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आधीच वादात सापडलेल्या ठेकेदार कंपनीला कोट्यवधी रुपयांचे कंत्राट पुन्हा देण्याच्या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार सदर कंपनीला दिलेले कंत्राट रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) वृक्ष प्राधिकरण यांच्या दिनांक २२/०३/२०१६ रोजीच्या पत्रानुसार प्रथम वृक्ष गणनेचे काम संबंधित कंपनीस देण्यात आले होते. तसेच, मिळकत कर आकारणी विभागाने वृक्ष गणनेच्या कामानंतर म्हणजेच दिनांक २४/०६/२०१६ रोजी मे.सार आयटी रिसोर्सेस प्रा.लि. व मे.सायबरटेक सिस्टिम लि. यांना मिळकत कर सर्वेक्षणाचे काम दिले होते.

मे.सार आयटी रिसोर्सेस प्रा.लि. यांनी वृक्ष गणनेचे काम दिनांक २८ मार्च २०२४ रोजी यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आलेले आहे. तथापि, मे.सार आयटी रिसोर्सेस प्रा.लि. व मे.सायबरटेक सिस्टिम लि. यांनी मिळकत कर सर्वेक्षणाचे कामामध्ये ८८ टक्के चुका केल्यामुळे सदर दोन्ही कंपन्यांवर महापालिकेमार्फत दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. तथापि, त्यांना काळ्या यादीत टाकलेले नाही.

उक्त कारवाईच्या संदर्भात संबंधित कंपनीने पुणे महानगरपालिकेविरूध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे Arbitration Petiton no.१७८/२०२४ दाखल केला आहे व लवादाची (Arbitrator) ची नेमणूक करण्यात आलेली आहे.

तसेच, वृक्ष गणनेच्या कामासाठी सदर निविदा प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात आलेली असून, निविदा अटी शर्तीचे पालन करून, महानगरपालिका आयुक्त ठराव क्रमांक ६/१४६ दिनांक ०७/०५/२०२५, तांत्रिक छाननी समिती,पुणे मनपा ठराव क्रमांक २५८ दिनांक ०१/१२/२०२५, व स्थायी समिती, पुणे मनपा ठराव क्रमांक १७११ दिनांक ०६/०२/२०२६ च्या मान्यतेनंतर संबंधित कंपनीस माहे फेब्रुवारी २०२६ मध्ये निविदा मंजूर झालेली आहे.

संबंधित कंपनीस दिलेले काम हे निविदा अटी शर्तींचे पालन करून देण्यात आलेले असल्यामुळे निविदा रद्द करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील अंधेरी सबवे येथे पर्जन्य जलवाहिनी टाकण्याचा निर्णय रद्द केल्याबाबत

**(९) * ८८६२ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दरवर्षी अतिरिक्त पाऊस पडल्यावर अंधेरी (मुंबई) सबवे जलमय होऊन वाहतूक विस्कळीत होत असल्याने यातून मार्ग काढण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने पाणी वाहून जाण्यासाठी पर्यायी पर्जन्य जलवाहिनी टाकण्याचा घेतलेला निर्णय रद्द करण्यात येऊन त्याऐवजी आता अंधेरी सबवे उड्डाणपूल बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाळयात अंधेरी भुयारी मार्ग, दाऊद बाग, आझाद नगर या परिसरात पूरसदृश परिस्थिती निर्माण होत असून, मोगरा नाल्यामुळे निर्माण होणाऱ्या पूरस्थितीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी नाल्याचा प्रवाह वळविणे, पाणी साठवण टाकी उभारणे तसेच नाल्याची क्षमता वाढविण्यासाठी आय.आय.टी., मुंबईकडून सविस्तर तांत्रिक अहवाल तयार केला जात असून, त्यानंतर अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पूल बांधण्याचा निर्णय व्यवहार्य आहे की नाही याचा अभ्यास करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली असून सदर समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, प्रशासनाकडून यासाठी आवश्यक निधीचीही तरतूद करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, अहवालातील शिफारशीचे स्वरूप काय आहे, त्यानुषंगाने अंधेरी येथील सबवेमध्ये पर्जन्य जलवाहिनी टाकण्याच्या महानगरपालिकेच्या निर्णयाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) अंधेरी सबवे उड्डाणपूल बांधण्याची व्यवहार्यता तपासण्यासाठी नेमण्यात आलेल्या तांत्रिक सल्लागार मे. टेक्नोजेम कन्सल्टंट प्रा. लि. यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेस अहवाल सादर केला आहे. त्यानुसार अंधेरी सबवे येथील भौगोलिक परिस्थितीचा विचार करता सदर ठिकाणी पूल बांधणे शक्य नाही. त्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून निधीची तरतुद करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

अंधेरी सबवे येथे पर्जन्य जलवाहिनी टाकण्याच्या कामाची तसेच वळण कामाची आयटीआय, मुंबई यांच्याकडून व्यवहार्यता तपासण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई येथील सिडको वसाहत विभागातील भूखंड व सदनिकांशी संबंधित कागदपत्रे गहाळ झाल्याबाबत

**(१०) * ९२७५ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ, श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथील सिडको वसाहत विभागातील भूखंड व सदनिकांशी संबंधित महत्त्वाची मालमत्ता कागदपत्रे/फाइल्स गहाळ झाल्याची घटना माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिडको विभागातील मालमत्ता कागदपत्रे गहाळ होण्याच्या घटनांमुळे प्रशासनातील त्रुटी निदर्शनास आल्या असून, उक्त त्रुटी कोणत्या आहेत व त्यावर काय उपाययोजना करण्यात येणार आहेत,
(३) असल्यास, या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सर्व मालमत्ता नोंदींचे तातडीने डिजिटलायझेशन करण्याची मागणी करत मा.मुख्यमंत्री महोदयांना पत्र दिले असून भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी सिडकोच्या सर्व मालमत्ता नोंदींचे डिजिटलायझेशन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भूखंड व सदनिकांशी संबंधित महत्वाची फाईल्स गहाळ करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) सिडको महामंडळामध्ये जीर्ण झालेल्या जुन्या नस्ती / संचिका जतन करण्यासाठी व संचिका गहाळ होऊ नये म्हणून मालमत्तेचे व्यवस्थापनासाठी विभागनिहाय अभिलेख कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे. सदर कक्षामध्ये संबंधित नस्ती / संचिकेच्या आवक जावक नोंदी करीता नोंदवही ठेवण्यात आलेली आहे. सिडको महामंडळातील उक्त अभिलेखांचे / भाडेपट्टाधारकांच्या मालमत्तेचे डिजीटल स्वरूपात नोंद करण्याचे कार्य मे. पायोनिअर फाउंडेशन इंजिनिअर प्रायवेट लिमिटेड यांचेमार्फत दिनांक २७/११/२०२४ पासून सूरू आहे.

सिडकोच्या वसाहत विभागामध्ये आतापर्यंत सुमारे १,३२,५९० भुखंडाचा तपशील अद्ययावत करण्यात आलेला असून उर्वरीत सुमारे ५०,००० भुखंडाचे डिजीटलायजेशन पुढील ०६ महिन्यात करण्याचे नियोजित आहे.
(४) मा.ॲड.निरंजन डावखरे, वि. प. स. यांचे दिनांक २५/०३/२०२५ रोजीच्या पत्र व जोडपत्रानुसार सिडको महामंडळांतर्गत व्यवस्थापक (शहरसेवा-२) यांच्या कार्यालयातील संचिका क्र. ५८५, उलवे गहाळ झाल्याचे नमुद होते. उक्त पत्रावरील मा.मुख्यमंत्री महोदयांच्या निर्देशानुसार पोलीस उप महानिरीक्षक दर्जाच्या अधिकारी यांचेमार्फत चौकशी करण्यात आली आहे. सदर चौकशीमध्ये नस्ती गहाळ झाल्याबाबत निष्पन्न झालेले नाही.

तसेच सदर प्रश्नामध्ये सन २०२६ मध्ये वसाहत विभागामध्ये मालमत्ता कागदपत्रे / फाईल्स गहाळ झाल्याची घटना देखील निदर्शनास आलेली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील मैदानांमध्ये व्यावसायिक बांधकामाला परवानगी दिली असल्याबाबत

**(११) * ८८१९ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमधील आझाद, ओव्हल, क्रॉस यांसारख्या मैदानांमध्ये पंचतारांकित हॉटेल्स, मॉल, व्यापारी संकुलांना परवानगी देण्यासाठी विकास नियंत्रण नियमावलीत बदल करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याची बाब दिनांक १७ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नगरविकास विभागाने एकीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीत (UDCPR) बदल करून ३०% जागेत व्यावसायिक बांधकामाला परवानगी दिल्यामुळे मुंबईत मोठी मैदाने वाचविणे कठीण होणार असल्याने क्रीडा क्षेत्रात पिछेहाट होत असून विद्यार्थ्यांच्या भविष्याकडे दुर्लक्ष होत आहे, तसेच हिरवळीची जागा नष्ट होऊन कॉंक्रीटीकरणामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडेल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहरी विकास आणि व्यापारीकरणाच्या शर्यतीत खेळाच्या मैदानांचे जतन करणे हे भविष्यातील पिढीच्या आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असून मुंबई सारख्या गजबजलेल्या शहरात मुलांना खेळांसाठी मैदाने उपलब्ध नसताना शासनाने घेतलेला हा निर्णय रद्द करुन खेळांची मैदाने वाचविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

आझाद, ओव्हल, क्रॉस ही मैदाने बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये येत आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्राबाहेरील नियोजन प्राधिकरणे / प्रादेशिक योजना क्षेत्राकरीता UDCPR नियमावली लागू आहे.

शासनाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्राबाहेरील नियोजन प्राधिकरणे / प्रादेशिक योजना क्षेत्रामध्ये एकात्मिक क्रिडा संकुल (Integrated Sports Complex) अंतर्गत स्टेडियम, क्रिडांगण, बंदिस्त क्रिडासंकुल यासह सर्व प्रकारच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिडा स्पर्धासाठी आवश्यक ती मोकळी मैदाने / बांधकाम, प्रेक्षक गॅलरी, खेळाडूंची निवासस्थाने, ट्रेनिंग व्यवस्था, अनुषंगीक कर्मचारी निवासस्थाने / कार्यालये या वापरां व्यतिरिक्त काही क्षेत्रावर तारांकित हॉटेल, क्रिडा सुविधा इ. प्रयोजनाकरीता बांधकाम अनुज्ञेय करण्याचे दृष्टीकोनातून Integrated Sports Complex ही तरतूद UDCPR नियमावलीमध्ये समाविष्ट करण्यासाठी दिनांक ०६/०४/२०२६ रोजी अधिसूचना निर्गमित केलेली आहे. सदरची तरतूद ही बृहन्मुंबई महानगरपालिकेसाठी लागू होत नाही.
(२) व (३) हे खरे नाही.

दिनांक ०६/०४/२०२६ रोजीची Integrated Sports Complex बाबतची अधिसूचना ही प्रामुख्याने क्षेत्रामध्ये एकात्मिक क्रिडा संकुल (Integrated Sports Complex) अंतर्गत स्टेडियम, क्रिडांगण, बंदिस्त क्रिडासंकुल यासह सर्व प्रकारच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिडा स्पर्धासाठी आवश्यक ती मोकळी मैदाने / बांधकाम, प्रेक्षक गॅलरी, खेळाडूंची निवासस्थाने, ट्रेनिंग व्यवस्था, अनुषंगीक कर्मचारी निवासस्थाने / कार्यालये या वापरां व्यतिरिक्त काही क्षेत्रावर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिडा स्पर्धांचे आयोजन करण्याच्या दृष्टीकोनातून तारांकित हॉटेल, क्रिडा सुविधा इ. एकात्मिक क्रीडा संकुलांसाठी व क्रिडा विषयक पुरक सुविधांकरीता करण्यात आलेली आहे. तसेच दिनांक ०६/०४/२०२६ रोजीच्या अधिसूचनेद्वारे निर्गमित केलेली Integrated Sports Complex बाबतची उक्त तरतूद बृहन्मुंबई महानगरपालिकेस लागू होत नाही. तसेच Integrated Sports Complex हे आरक्षण असून सदर आरक्षणाचे सनियंत्रण व विकसन हे राज्य शासनाचे क्रिडा विभाग आणि संबंधित नियोजन प्राधिकरणाने

करण्याचे आहे. तसेच, सदर अधिसूचनेनुसार कोणत्याही बांधकामास जसे मॉल, शॉपिंग कॉप्लेक्स इ. व्यावसायीक बांधकामास परवानगी अनुज्ञेय करण्यात आलेली नाही.
(४) विलंब होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धारावी पुनर्विकास प्रकल्पातील शताब्दीनगर येथील झोपडीधारकांच्या पात्रता निश्चितीत अनियमितता झाल्याबाबत

**(१२) * ९१२३ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धारावी (मुंबई) पुनर्विकास प्रकल्पातील पात्रता निश्चितीत शताब्दीनगरच्या परिशिष्ट -२ मध्ये ४० जणांनी बनावट कागदपत्रे सादर करुन पात्रता मिळविल्याचे तसेच त्यांना घरे वितरीत करण्यात आल्याची बाब माहे मार्च, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी मा.लोकप्रतिनीधी यांनी शासनाकडे तक्रार केली असता नियुक्त चौकशी समितीने माहे एप्रिल, २०२६ मध्ये अहवाल सादर करून ४० जण अपात्र असल्याचे सिध्द केले, आता ही संख्या ९० पर्यंत पोहोचली असून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बनावट प्रकारानंतर धारावी पुनर्विकास प्रकल्पाद्वारे शताब्दीनगरच्या रहिवाशांच्या कागदपत्रांची पुन्हा पडताळणी सुरू केली असून, दोषी आढळणाऱ्या बोगस लाभार्थ्यांची पात्रता रद्द करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, धारावी पुनर्विकास प्रकल्पातील पात्रता याद्या टप्याटप्याने जाहीर केल्या जात असल्याने त्यात असे अनेक गैरप्रकार होण्याची शक्यता असून पात्र लाभार्थ्यांवर अन्याय होऊ नये याकरीता पारदर्शी पध्दतीने पात्रता याद्या जाहीर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) धारावी पुनर्विकास प्रकल्पातील शताब्दीनगर येथील ८५१ झोपडीधारकांचे प्रारूप परिशिष्ट सन २०१५ मध्ये म्हाडा मार्फत प्रसिध्द करण्यात आले होते.

धारावी अधिसूचित क्षेत्रातील पात्रता निश्चितीबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्याकरीता त्रिसदस्यीय समीती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने सादर केलेल्या अहवालानुसार ४४ झोपडीधारक हे मूळ परिशिष्टमध्ये समाविष्ट नसल्याने त्यांना सदर योजनेचा कुठलाही लाभ अनुज्ञेय होत नाही. तद्नंतर शताब्दीनगरमधील वेळोवेळी प्रसिध्द करण्यात आलेल्या पुरवणी परिशिष्टांची तपासणी करण्यात येवून मूळ परिशिष्ट-२ मध्ये समाविष्ट नसलेल्या एकूण ७८ झोपडीधारकांना अपात्र करण्यात आले आहे. सदर अपात्र झोपडीधारकांना संक्रमण शिबीरामधील घरांचे वितरण करण्यात आलेले नाही.

सदर झोपडीधारकांनी सादर केलेले पुरावे पडताळणी करणेकरीता संबंधित विभागाकडे पाठविण्यात आले आहे. पुराव्यांचे पडताळणी अहवाल प्राप्त होताच संबंधितांविरुध्द नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) धारावी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत झोपडीधारकांची पात्रता गृहनिर्माण विभागाकडील दिनांक १६/०५/२०१५, दिनांक १६/०५/२०१८ व दिनांक ०४/१०/२०२४ मधील शासन निर्णयानुसार व विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ नियम ३३ (१०) अ मधील तरतुदीनुसार निश्चित करण्यात येत आहे. तसेच झोपडीधारकांकडून प्राप्त होणारे सर्व पुरावे डीजीटल स्वरुपात संकलीत करण्यात येत आहे. झोपडीचे मोजमाप डिस्टोमीटरचे सहायाने घेण्यात येत आहेत. याशिवाय झोपडीधारकांचे पात्रतेबाबतचे परिशिष्ट -२ धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.
(५) अशी बाब नाही.

-----------------

## नाशिक विभागातील औषध निरीक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१३) * ९४४६ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक विभागात औषध निरीक्षकांच्या २४ मंजूर पदांपैकी २२ पदे रिक्त असून केवळ २ (दोन) निरीक्षकांवर संपूर्ण नाशिक विभागाचे कामकाज सुरू असल्याची बाब दिनांक १२ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अन्नपदार्थांतील भेसळ रोखणे आणि रास्त दरात प्रमाणित औषध मिळण्यासाठी कायद्यानुसार आवश्यक यंत्रणा राबविणाऱ्या अन्न व औषध प्रशासन विभागातील ३१ टक्के पदे रिक्त असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सामान्य जनतेच्या आरोग्याच्या हितासाठी काम करणाऱ्या या विभागाकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे अपुऱ्या अधिकारी व कर्मचारी वर्गावर या विभागाला काम करावे लागत असून जळगाव, धुळे आणि नंदुरबार या जिल्ह्यात एकही कायमस्वरूपी औषध निरीक्षक नाही, परिणामी औषध विक्रीच्या तपासणीवर आणि गुणवत्तेवर विपरीत
परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील नाशिक विभागासह अन्य विभागातील रिक्त असलेली औषध निरीक्षकांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

नाशिक विभागात औषध निरीक्षकांची २६ पदे मंजूर आहेत. त्यापैकी २ पदे भरलेली असून २४ पदे रिक्त आहेत.

अन्न व औषध प्रशासनात गट "अ" व "ब" या संवर्गात ७९७ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ५३८ पदे भरलेली असून २५९ पदे रिक्त आहेत. त्याचे प्रमाण ३२ टक्के आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.

नाशिक विभागातील जळगांव, धुळे व नंदुरबार या जिल्ह्यात ९ औषध निरिक्षकांची पदे मंजूर आहेत. परंतु, सदर सर्व पदे रिक्त आहेत. ज्या जिल्ह्यात औषध निरीक्षक नाहीत, त्या जिल्ह्यात सहायक आयुक्त हे औषध निरीक्षकांचे कामकाज आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांच्या निर्देशाप्रमाणे करीत

आहेत. अन्न व औषध प्रशासनाने नेमून दिलेले इष्टांक उपलब्ध मनुष्यबळाच्या आधारे पूर्ण करण्यात येत आहे.

नाशिक विभागात कार्यरत असलेले औषध निरीक्षक व सहायक आयुक्त (औषधे) यांच्यामार्फत औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० व त्यांतर्गत नियम, १९४५ मधील तरतूदीनुसार वर्ष २०२५ व २०२६ मध्ये ७१४ औषध विक्री पेढ्यांची तपासणी करण्यात आली आहे. सदर पेढ्यांपैकी १२६ औषध विक्री पेढ्यांचे परवाने निलंबित करण्यात आले असून ६५ औषध विक्री पेढ्यांचे परवाने कायमस्वरुपी रद्द करण्यात आले आहे. तसेच, ०३ उत्पादन संस्थेचे परवाने कायमस्वरुपी रद्द करण्यात आले आहेत.

(४) औषध निरीक्षक, गट-ब संवर्गाच्या एकूण १०९ पदांच्या पदभरतीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक २९/०७/२०२५ रोजी जाहिरात क्रमांक ११६/२०२५ प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसेच, उक्त जाहिरातीत अतिरिक्त ४५ पदांचा नव्याने समावेश करून एकूण १५४ पदांची पदभरती करण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगास दिनांक १२/०१/२०२६ रोजी अतिरिक्त मागणीपत्र पाठविण्यात आले आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिनांक २५/०२/२०२६ रोजी शुध्दीपत्रक निर्गमित करून १५४ औषध निरीक्षक पदांची जाहिरात प्रसिध्द केली आहे. सदर पदांची लेखी परीक्षा महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक २२/०३/२०२६ रोजी घेण्यात आली आहे. सदर लेखी परिक्षेचा निकाल नुकताच आयोगाने जाहीर केला आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येणार असून मुलाखतीनुसार अंतिम निकाल प्रसिध्द करून शिफारस केल्यानंतर नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## जोगेश्वरी (पूर्व) येथील जुने पंप हाऊस भुयारी मार्गातील अस्वच्छता दूर करणेबाबत

**(१४) * ९५६८ श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी (पूर्व) येथील पश्चिम द्रुतगती महामार्गाखालील जुना पंप हाऊस भुयारी मार्गामध्ये वा आजूबाजूला भिकाऱ्यांचा वावर व अस्वच्छतेचे प्रमाण जास्त प्रमाणात असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भुयारी मार्गात संध्याकाळच्या वेळी खुलेआम दारू पिण्याचे प्रकार घडत असल्याने स्थानिक नागरिक, महिला व मुलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भुयारी मार्गातील दुर्गंधी, अस्वच्छता आणि भिकाऱ्यांच्या उपद्रवांमुळे हजारो प्रवाशांना या मार्गाचा वापर सोडून थेट महामार्गावरून चालत जावे लागत असून या भुयारी मार्गाची तातडीने स्वच्छता करून तेथे कायमस्वरूपी सुरक्षारक्षक तैनात करण्याबाबत व अवैध प्रकारांना आळा घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर ठिकाणी भिकाऱ्याचा वावर असतो. तथापि, सदर ठिकाणी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून दिवसातून दोन वेळा नियमितपणे साफसफाई करण्यात येते.

(२) हे खरे नाही.

(३) सदर परिसरात अंधेरी पोलीस ठाण्याकडून गस्ती वाहनाने वेळोवेळी गस्त करुन पडताळणी करण्यात येत असते.

तसेच निर्भया पथकाकडून व पोलीस ठाणेच्या मोबाईल मार्शल्स वाहनाकडून गस्त करण्यात येते. त्याचबरोबर सदर परिसरात वेगा हेल्मेट दुकानाच्या समोर साउथ बाँड येथे नाकाबंदीचे आयोजनही करण्यात येते. बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून भुयारी मार्गात नियमितपणे साफसफाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) येथील सिडको अंतर्गत वाटप केलेल्या भूखंडांचा ताबा घेतल्याच्या निर्णयाबाबत

**(१५)** * **९३४७ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडको अंतर्गत पनवेल तालुक्यातील अनेक भूखंड / जमिनी दीर्घकाळापासून विनावापर किंवा अपूर्णावस्थेत असल्याचे तसेच अटींचे पालन न केल्यामुळे काही भूखंड शासनाने परत ताब्यात घेतल्याचा निर्णय माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडको प्राधिकरणाच्या माध्यमातून शहराचे नियोजन करताना एकूण क्षेत्रफळाच्या ठराविक टक्केवारीत जागा ही क्रीडांगणे व उद्याने यासाठी आरक्षित ठेवणे बंधनकारक असताना सदरहू नियमांचे काटेकोरपणे पालन केले जात नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पनवेल तालुक्यात सिडको अंतर्गत एकूण किती भूखंड विनावापर आहेत, अशा भूखंडापैकी आतापर्यंत किती भूखंड/जमिनी सिडकोकडून रद्द करून महसूल विभागाने परत ताब्यात घेतल्या आहेत, उर्वरित किती भूखंड नियमभंगामुळे परत घेण्याच्या प्रक्रियेत आहेत किंवा घेण्यास पात्र आहेत,

(४) असल्यास, सिडको क्षेत्राचे पनवेल भागातील एकूण किती क्षेत्रफळ व त्यातील किती जागा मैदान व उद्यानासाठी आरक्षित ठेवणे बंधनकारक आहे, अपेक्षित नियमानुसार जागा आरक्षित केलेली मैदाने व उद्याने आरक्षित करुन भविष्यात भूखंड वितरित केल्यानंतर त्वरित विकास व्हावा यासाठी शासनाने कोणती धोरणात्मक कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) सिडकोने नवी मुंबई प्रकल्पांतर्गत वेळोवेळी शासनाने दिलेले निदेश व सिडको संचालक मंडळाने मान्य केलेल्या मानकानुसार येणाऱ्या विविध नोड्‌समध्ये क्रीडांगणे, उद्याने आणि इतर सोयी - सुविधांकरीता भुखंड आरेखित केले आहेत. तद्नंतर दिनांक ०१/१०/२०१६ रोजीच्या अधिसुचनेद्वारे पनवेल, कळंबोली, कामोठे आणि इतर भागाकरीता पनवेल महानगरपालिकेची स्थापना करण्यात आली असून पनवेल, कळंबोली, कामोठे या नोड करीता पनवेल महानगरपालिका नियोजन प्राधिकरण म्हणुन कार्यरत आहे.

पनवेल महानगरपालिकेने दिनांक ८/८/२०२४ रोजी महानगरपालिका नियोजन प्राधिकरण हद्दितील क्षेत्राचा प्रारुप विकास आराखडा प्रसिध्द केला असून यामध्ये क्रीडांगणे, उद्याने आणि इतर सोयी सुविधांकरीता भुखंड आरक्षित केले आहेत.

(३) पनवेल तालुक्यात सिडको अंतर्गत विनावापर व अपूर्ण अवस्थेत पडून राहिलेले कुठलेही भूखंड / जमिनी सिडकोकडून रद्द करून महसूल विभागाने परत ताब्यात घेतल्याचे दिसून येत नाही. सद्य:स्थितीत, वितरित करण्यात आलेल्या भूखंडांपैकी २८ भूखंड धारकांनी प्रारंभ प्रमाणपत्र व बांधकाम पूर्णत्व प्रमाणपत्र सादर केलेले नाही. सदर भुखंडांपैकी १४ भुखंड शासकीय संस्थेस (PSU), ७ भुखंड सामाजिक संस्थेस तसेच ७ भुखंड खाजगी संस्थेस दिलेले आहेत. सदर भूखंडांबाबत सिडको महामंडळाच्या स्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) पनवेल महानगरपालिका नियोजन प्राधिकरण असलेल्या सिडको क्षेत्राकरीता एकूण १४९.८८ हेक्टर इतके क्षेत्र खेळाचे मैदान व उद्यान या वापराकरीता प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये सिडको क्षेत्राकरीता अद्याप पर्यंत ३२ भूखंड खेळाचे मैदानाकरीता व ७२ उद्यानाकरीता सिडको कार्यालयाने पनवेल महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केले आहेत.

त्यानुसार पनवेल महानगरपालिकेमार्फत ३२ खेळाचे भूखंडापैकी ८ भूखंड विकसित करण्यात आले असून ३ भूखंड विकसित करण्याचे काम प्रस्तावित आहे. तसेच पनवेल महानगरपालिकेमार्फत ७२ उद्यान भूखंडापैकी ६४ भूखंड विकसित करण्यात आले असून ८ भूखंड विकसित करण्याचे काम प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसई (जि.पालघर) येथील तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात अनियमितता होत असल्याबाबत

**(१६) * ८९९१ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाने अन्न व नागरी पुरवठा विभागांतर्गत सर्व शिधापत्रिकाधारकांना ऑनलाईन सेवेद्वारे ई-शिधापत्रिका सुविधा विनामूल्य उपलब्ध करून देण्याचा निर्णय दिनांक १६ मे, २०२३ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई (जि.पालघर) येथील तहसिल कार्यालयातील पुरवठा विभागात गैरव्यवहार होत असून या विभागातील सध्या कार्यरत पुरवठा निरीक्षण अधिकारी हे शासनाची फसवणूक करून कोट्यवधी रक्कमेचा अपहार करीत असल्याच्या कारणावरून स्थानिक सामाजिक संघटनांनी आमरण उपोषणाचा गंभीर इशारा स्थानिक प्रशासनास माहे एप्रिल, २०२६ मध्ये दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रेशन दुकानदारांकडून लाभार्थ्यांची लूट, रेशनमध्ये भेसळ, आणि शिधापत्रिका (Ration Card) संबंधित कामांसाठी पैशांची मागणी केली जात असून सदर तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाच्या गोपनीय कार्यालयात १३ खाजगी कर्मचारी वसूलीची कामे करीत असून सामान्य जनतेची मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पुरवठा नियंत्रण अधिकारी ह्यांचे जिल्हा पुरवठा अधिकारी आणि मंत्रालयातील संबंधित अधिकारी यांचेशी संगनमत आहे तसेच प्रशासनाकडून याबाबत सखोल चौकशी करून संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) होय, हे खरे आहे.
(२) स्थानिक दुकानदार यांनी दिनांक १७/०४/२०२६ रोजी पुरवठा निरीक्षण अधिकारी यांची वसई जि.पालघर पुरवठा शाखेतील कामकाजाबाबत तक्रार केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार यांनी दिनांक ०३/०६/२०२६ रोजी कोणतीही तक्रार नसल्याचा जबाब लिहून दिला आहे.
(३) व (४) वसई तहसील कार्यालयातील पुरवठा शाखा येथे डेटा एन्ट्री करणे, ई-केवायसी करणे, आधार सिडींग, मोबाईल सिडींग, वयोवृध्द नागरिकांचे रेशनकार्ड ऑनलाईन करणे इ.कामांकरीता ०७ संगणक ऑपरेटर यांची केवळ तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करण्यात आली होती. तथापि, या संदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, सदर बाब जिल्हा पुरवठा अधिकारी, पालघर कार्यालयाने गठीत केलेल्या चौकशी समितीच्या निर्दशनास आली होती. त्यास अनुसरून संगणक ऑपरेटर यांच्या नेमणूका वसई तहसिल कार्यालयाकडून रद्द करण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईत उभारण्यात येणारा ‘महाविस्टा’ प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(१७) * ८७८२ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिल्लीमधील सेंट्रल विस्टाच्या धर्तीवर मुंबईतील मंत्रालय, विधानभवन व मंत्री महोदयांच्या शासकीय निवासस्थानांच्या जागी उभारण्यात येणारा रुपये ७,५०० कोटीचा ‘महाविस्टा’ प्रकल्प प्रलंबित असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाची अनेक छोटी-मोठी शासकीय कार्यालये मुंबई येथे भाड्याच्या जागेत असून विखुरलेल्या या शासकीय कार्यालयांना एकाच छताखाली आणण्यासाठी एअर इंडीयाची टोलेजंग इमारत विकत घेण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाविस्टांसाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर निविदा काढल्या जाणार असून रुपये ७५०० कोटींहून अधिक खर्च प्रस्तावित करण्यात आला आहे तसेच मंत्रालय परिसरातील सात एकर जागेवर टोलेजंग इमारती उभ्या करुन महाविस्टा तयार करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मरिन ड्राईव्ह (मुंबई) येथील एअर इंडियाची इमारत विकत घेण्यासाठी सुमारे रुपये १,६०० कोटी एवढ्या रक्कमेचा निधी वित्त विभागाकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आला असून, या इमारतीचा करारनामा लवकरच करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, ‘महाविस्टा’ प्रकल्प प्रलंबित राहील्यामुळे शासनाच्या दीर्घकालीन पायाभूत नियोजनावर परिणाम होत असून मंत्रालयाशेजारी उभारण्यात येत असलेली ‘अ‍ॅनेक्स-२’ इमारत व इतर प्रस्तावित प्रकल्प पुन्हा सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) एअर इंडिया इमारत शासनाचे ताब्यात आली आहे.

(३) सदर प्रकल्प बहुमजली इमारतींचा असेल हे खरे आहे. परंतु प्रकल्पाचा आर्थिक व भौतिक वाव अद्याप अंतिम नाही.

(४) एअर इंडिया इमारत खरेदी प्रक्रिया जुन-२०२६ मध्ये पूर्ण करण्यात आली आहे.

(५) व (६) मंत्रालय शेजारी नवीन प्रशासकीय विस्तारीत इमारत क्र.२ चे काम प्रगतीत असून ऑगस्ट-२०२६ पर्यंत सदर काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. महाविस्टा प्रकल्पाबाबत Expression of interest वेळी माहे एप्रिल-२०२५ मध्ये प्राप्त सल्लागारांनी केलेले सादरीकरण/Concept आवश्यक त्या दर्जाचे नसल्याने फेरनिविदा काढण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

-----------------

## नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या नावे बनावट कार्यादेश तयार करुन कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१८) * ८७०४ श्री.पंकज भुजबळ, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक-त्र्यंबकेश्वर येथील आगामी कुंभमेळ्याच्या अनुषंगाने विविध विकासकामे सुरू असताना नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण, विभागीय आयुक्त तथा कुंभमेळा आयुक्त यांच्या बनावट स्वाक्षरीचा तसेच डिजिटल स्पूफिंग तंत्रज्ञानाचा वापर करून सुमारे ७० कोटी रुपयांच्या कामांचे बनावट कार्यारंभ/कार्यादेश तयार करण्यात आले असल्याची बाब दिनांक ३० एप्रिल, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

**(२)** असल्यास, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून बनावट स्वाक्षरी, डिजिटल प्रणालीचा गैरवापर व बनावट कार्यादेश तयार करण्यास जबाबदार असलेल्या संबंधित व्यक्ती, अधिकारी किंवा एजन्सींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

**(३)** असल्यास, कुंभमेळ्याशी संबंधित सर्व कामांची पडताळणी व चौकशी करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला असून मोठ्या सार्वजनिक प्रकल्पांमध्ये कामांचे वाटप, कार्यादेश निर्गमन व मंजुरी प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरक्षित व पडताळणीयोग्य करण्यासाठी सुरक्षित डिजिटल प्रमाणीकरण प्रणाली लागू करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

**(४)** नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) याबाबत नाशिक पोलीस आयुक्तालयातील नाशिक रोड पोलीस स्टेशन येथे गु. र. नं. २९१/२०२६, भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम ३१८(१), ३३६(२), ३३६(३), ३३८, माहिती तंत्रज्ञान अधिनियम ६६ (ब) प्रमाणे दिनांक २६/०४/२०२६ रोजी गुन्हा (FIR) दाखल केला असून सदर गुन्ह्यातील आरोपीस

अटक करण्यात आलेली असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे

तसेच भद्रकाली पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं. १९७/२०२६ भा.न्या.सं., २०२३ चे कलम ३१८ (१), ३३६ (२), ३३६(३), ३३८ प्रमाणे दिनांक ११/०५/२०२६ रोजी गुन्हा (FIR) दाखल केला असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(३) नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाकडुन यापुढे निर्गमित करण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या आदेशांवर युनिफॉर्म QR Code सहित आदेश निर्गमित करण्यासाठी प्रणाली विकसित करण्याचे काम प्रगतीपथावर सुरु आहे. ज्यामध्ये QR Code स्कॅन केल्यावर सदर QR Code ज्या आदेशाचा आहे त्याचे पडताळणी करणे शक्य होणार आहे. ज्या सार्वजनिक पोर्टलवरती आदेश प्रसिध्द करण्यात आला आहे, त्या पोर्टलच्या लिंकशी संलग्नित करण्यात येणार आहे ज्यामुळे मूळ आदेश त्वरीत पाहुन पडताळणी सुलभ होणार आहे व प्रमाणीकरण शक्य होणार असल्याबाबत नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाकडून कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील पार्किंगची क्षमता ५० टक्क्यांनी कमी करण्यात येणार असल्याबाबत

**(१९) * ९३२२ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचतारांकित हॉटेल व्यावसायिकांनी केलेल्या मागणीनुसार मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील पार्किंगची क्षमता ५० टक्क्यांनी कमी करण्यात येणार असून उर्वरित ५० टक्के जागा त्यांना उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विचाराधीन असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंचतारांकित हॉटेल व्यावसायिकांच्या सोयीच्या या प्रस्तावानुसार पार्किंगची क्षमता ५० टक्के करण्यासाठी विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये (डीसीपीआर) बदल करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विमानतळ परिसरातील दिवसेंदिवस वाढत असलेली प्रवाशांची संख्या पाहता सद्य:स्थितीत उपलब्ध असलेली पार्किंगची जागा पंचतारांकित हॉटेल व्यवसायिकांना देण्याच्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निर्णयास शासन स्थगिती देणार आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रस्तावास स्थगिती न देण्याची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२), होय हे खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने सादर केलेल्या अहवालानुसार, हॉटेल आणि रेस्टॉरंट असोसियेशन (Western India) यांजकडून प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७ अंतर्गत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ च्या विनियम ३३(४) अट क्रमांक ६ मध्ये व विनियम ४४ च्या तक्ता क्र २१ मध्ये बदल / समाविष्ट करणेकामी महापालिकेच्या नगर नियोजन विभागाने प्रस्ताव सुधार समिती व महापालिकेस सादर केला आहे.

सदर प्रस्तावित विनियम अन्वेय मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ परिसरातील २ किलोमीटर सिमारेषेमध्ये स्थित असलेल्या तारांकित श्रेणीमधील हॉटेलकरीता अपेक्षित असलेल्या पार्किंगच्या क्षमतेच्या ५० टक्के पार्किंग उपलब्ध करणेकामी चे सदर प्रस्तावास सुधार समीती व महापालिकेची मंजुरी प्रलंबित आहे.

(३) विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये सुधारणा करणेबाबत नियोजन प्राधिकरण म्हणून महापालिकेने निर्णय घेतल्यास व त्यानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमातील तरतुदींनुसार फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन शासनास मंजूरीस्तव प्रस्ताव सादर केल्यास सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने प्राप्त हरकती/सूचना तसेच संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य यांचे अभिप्राय प्राप्त करुन याबाबत अंतिम निर्णय शासनाकडून घेणेची तरतूद आहे. त्यानुसार शासनास प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्यावर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) लागू नाही.

-----------------

## येवला (जि.नाशिक) शहरातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी पालखेड कालव्यामधून पाणीपुरवठा करण्याबाबत

**(२०) * ९३२१ श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) शहराच्या पाणीटंचाईच्या प्रश्नाच्या कायमस्वरूपी निराकरणासाठी पालखेड कालव्यामधून पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा करण्याबाबत येवला नगरपरिषदेने सादर केलेला प्रस्ताव सी.पी.डी.एम. कार्यालय, नरिमन पॉईंट, मुंबई येथे गत काही महिन्यांपासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येवला तालुक्यात पाणी टंचाईचे संकट असून तेथील गावे, वाड्यावस्त्यांना टँकरद्वारे पिण्याचे पाणी घ्यावे लागत असून विशेषतः पालखेड कालवा लाभक्षेत्रात नसलेल्या अनेक गावांमध्ये पाणी टंचाई जाणवू लागली असून, सदर गावांमध्ये आठवड्याच्या विलंबाने पाणी उपलब्ध होत असून विहीरी देखील कोरड्या पडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्ताव प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत, सदर पाणीपुरवठा योजना शासन स्तरावर मंजूर करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(४) असल्यास, येवला शहराचा पाणी प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी येवला नगरपरिषदेमार्फत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाला तातडीने मंजूरी मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) येवला शहराच्या पालखेड कालव्यामधून पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा करण्याबाबतच्या प्रस्तावाची सी.पी.डी.एम. कार्यालयात तांत्रिक तपासणी करून मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नाशिक यांना उपस्थित मुद्यांची पूर्तता करून घेऊन तांत्रिक मान्यता प्रदान करण्याबाबत दिनांक २२ जुलै, २०२४ रोजी कळविण्यात आले होते. त्यानुसार मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नाशिक यांनी उपस्थित मुद्यांची पूर्तता येवला नगरपरिषदमार्फत करून योजना आर्थिकदृष्ट्या सुयोग्य व किफायतशीर नसल्याचे निरीक्षण नोंदवून दिनांक २७ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या पत्रान्वये विविध भागातील अशुध्द पाणी रायझिंग मेन, अशुध्द पाणी ग्रॅव्हिटी मेन, विविध विभागांच्या परवानग्या इ. विविध

उपांगांचा समावेश असलेल्या रुपये १६०.०१ कोटी किंमतीच्या प्रस्तावास तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राजापूर व ४० गावे पाणीपुरवठा योजना प्रगतीपथावर आहे. येवला तालुक्यातील पूर्व भागात सद्य:स्थितीत भूजल पातळी खोल गेल्याने या भागातील गावांमध्ये टंचाई सदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती त्यामुळे, पंचायत समिती येवला मार्फत ४४ गावे व ७० वाड्या वस्त्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी ४ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले असून याद्वारे दररोज टँकरने एकूण ८० खेपा केल्या जात आहेत अशी वस्तुस्थिती पाणीपुरवठा विभागाने कळविली आहे.

(३) येवला शहराच्या पालखेड कालव्यामधून पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा प्रकल्पाच्या प्रस्तावास मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नाशिक यांनी दिनांक २७ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या तांत्रिक मंजुरीमध्ये येवला शहराकरीता पालखेड धरणातून पाईपलाईनद्वारे पाणी आणावयाचे असल्यास सदर योजनेचा खर्च खूप जास्त प्रमाणात असल्याने योजना आर्थिकदृष्ट्या व तांत्रिक व्यवहार्यता योग्य नसल्याचे नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत कळविण्यात आले आहे.

(४) व (५) येवला शहराची पाणीपुरवठा योजनेची आवश्यकता विचारात घेता येवला नगरपरिषदेने नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत गोदावरी डावा तट कालव्याद्वारे उद्भव असलेल्या रुपये १६१.१० कोटी किंमतीचा योजनेचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून यामध्ये ७ एम.एल.डी. क्षमतेच्या जलशुद्धीकरण केंद्र, जॅकवेल, ३ पाण्याच्या टाक्या, वितरण व्यवस्था, एक्सप्रेस फिडर, सोलार प्लांट इ. विविध घटकांचा असलेला प्रस्तुत प्रकल्पाचा प्रस्ताव अमृत २.० अभियानांतर्गत घेण्याच्या अनुषंगाने अमृत २.० अभियानांतर्गत गठित राज्यस्तरीय तांत्रिक समितीने तसेच, राज्यस्तरीय उच्चाधिकार समितीने केंद्र शासनाच्या शिखर समितीकडे मान्यतेसाठी शिफारस केली असून प्रस्तुत प्रस्तावास केंद्र शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर येवला शहराच्या गोदावरी डावा तट कालव्याद्वारे उद्भव असलेल्या पाणीपुरवठा प्रकल्पाच्या अनुषंगाने पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## मुंबईतील सीएसएमटी-कुर्ला पाचव्या व सहाव्या रेल्वे मार्गिकेच्या कामासाठी स्वदेशी मिल परिसरातील बांधकामे निष्कासित करण्याबाबत

**(२१)** * **९७८६ श्री.संजय खोडके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सर्वाधिक प्रलंबित असलेला रेल्वे प्रकल्प म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सीएसएमटी ते कुर्ला पाचव्या व सहाव्या मार्गिकेसाठी कुर्ला येथील स्वदेशी मिल परिसरातील ७१४ प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाची प्रक्रिया पूर्ण झाली असल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या ५,७९४ चौरस मीटर जमिनीचा ताबा रेल्वे प्रशासनाला मिळवून देण्यासाठी एमएमआरडीए मार्फत करण्यात येणाऱ्या गाळे पाडकामाची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, सदर प्रकल्पग्रस्तांना पर्यायी घरे उपलब्ध करून दिल्यानंतर, स्वदेशी मिल परिसरातील उर्वरित बांधकामे पूर्णपणे निष्कासित करून हा मार्गिका प्रकल्प पूर्ण करण्यासाठी करण्यात येणाऱ्या

कार्यवाहीचे स्वरुप व सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, गत अनेक वर्षांपासून प्रवाशांना गर्दीचा त्रास सहन करावा लागत असून प्रवाशांना अधिक लोकल गाड्यांचा लाभ मिळावा याकरीता सदर प्रकल्पाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३), (४) व (५) अंशत: खरे आहे.

सीएसएमटी ते कुर्ला पाचव्या व सहाव्या मार्गिका प्रकल्पामध्ये एकूण ७१४ झोपडीधारक बाधित असून त्यापैकी ६८९ झोपडीधारक पात्र आहेत. तर २५ झोपडीधारक अपात्र आहे. पात्र ६८९ झोपडीधारकापैकी ५८९ प्रकल्पग्रस्ताचे पुनर्वसन करण्यात आले आहे. त्यापैकी ५७० बांधकामे निष्काषित करण्यात आली असून उर्वरित १९ बांधकामे निष्काषित करण्याची कार्यवाही सुरु आहे. पात्र असलेल्या उर्वरित १०० बांधकामामध्ये ३९ सामाजिक सुविधा बांधकामे असून त्यापैकी ६ बांधकामाबाबतची सुनावणी रेल्वेच्या मिळकत न्यायालयाकडे सुरु आहे. उर्वरित ६१ पात्र झोपडीधारक पुनर्वसन स्वीकारत नसल्याने त्यांना एकतर्फी वितरणपत्र देण्यात आले आहे. तथापि, संबंधित ६१ झोपडीधारकांच्या मागण्यांच्या अनुषंगाने समन्वयाने तोडगा काढण्यात येत आहे. तदनंतर या १०० बांधकामांचे (३९ सामाजिक सुविधा व ६१ पात्र झोपडीधारक) देखील निष्कासन लवकरात लवकर करुन प्रकल्पाचे बांधकाम हाती घेण्याचे नियोजित आहे.

सदरहू प्रकरणाचा मा.पंतप्रधान कार्यालयाच्या प्रोजेक्ट मॉनिटरींग ग्रुप (PMO) द्वारे नियमित आढवा घेण्यात येत आहे.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने कचरा संकलनासाठीच्या वाहन खरेदीची चौकशी करण्याबाबत

**(२२)** * **९७९६ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेस शासनाने कचऱ्याचे ट्रान्सफर स्टेशन उभारण्यासाठी सुमारे ३२ कोटी रुपयांचा निधी दिला असून त्यापैकी फक्त तीन ट्रान्सफर स्टेशनची उभारणी करुन उर्वरित तीन ट्रान्सफर स्टेशनचे काम बाकी आहे तसेच ट्रान्सफर स्टेशनपासून कचरा नेण्यासाठी महानगरपालिकेने रुपये १८ कोटी एवढया बंदिस्त पध्दतीची कॅप्सूलसारखी वाहने खरेदी केली असल्याची बाब दिनांक ५ मे, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेने शहरातील कचरा संकलनासाठी गुजरात येथील वेस्टर्न इमॅजिनिटी या कंपनीस नेमणुकीपूर्वीच रुपये १८ कोटी एवढी रक्कम वाहने खरेदीसाठी दिली असून ट्रान्सफर स्टेशनचे काम अर्धवट असून, कचऱ्याचे वजन करण्यासाठी यंत्रणेचा अभाव, तसेच कंपनीला महानगरपालिकेमार्फत सदर स्टेशन उभारणीसाठी मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्या नसून शासकीय निधीचा दुरुपयोग केला असल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने केलेल्या वाहन खरेदी प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीच्या अनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशतः खरे आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) २.० अंतर्गत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास दिनांक ०४/१०/२०२४ रोजीचे शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यामध्ये छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेमध्ये ट्रान्स्फर स्टेशनकरीता रुपये ३२.०४ कोटी रकमेस मंजुरी देण्यात आली आहे. सदर कामांमध्ये ट्रान्स्फर स्टेशन अद्यावतीकरण/ उभारणी (स्थापत्य), ट्रान्स्फर स्टेशनसाठी मशीनरी, अनुषंगिक वाहन खरेदी इत्यादी कामांचा समावेश आहे.

सद्यःस्थितीत महानगरपालिकेमध्ये ३ ट्रान्स्फर स्टेशन असून त्यांचे अद्यावतीकरणाचे स्थापत्य काम पूर्ण करण्यात येवून तीनही ट्रान्स्फर स्टेशन कार्यान्वित करण्यात आले आहेत. तसेच ३ नवीन ट्रान्स्फर स्टेशन उभारणे नियोजित असून त्यापैकी २ ट्रान्स्फर स्टेशनची स्थापत्य कामे प्रगतीपथावर आहेत व १ ट्रान्सफर स्टेशन करीता स्थळ निश्चित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

स्थापत्य कामांव्यतिरिक्त सदर ६ ठिकाणी ट्रान्सफर स्टेशन यंत्रणा उभारणी करण्यासाठी महानगरपालिकेने निविदा प्रक्रीया करून प्रक्रीयेअंती मे. हायवा (इंडीया) प्रा.लि. यांची १७.५८ कोटी रकमेची निविदा स्वीकृत करून त्यांना कार्यादेश दिले आहेत. कार्यादेशानुसार प्रत्येक ठिकाणच्या ट्रान्सफर स्टेशन यंत्रणेची किंमत रुपये २.९३ कोटी असून त्यामध्ये २ स्टेशनरी कॉम्पॅक्टर्स, २ हुकलोडर्स (कॅप्सुलसारखी वाहने) व ४ कंटेनर्स (कॅप्सुल) चा समावेश आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील धान व भरडधान्यांच्या शासकीय हमीभाव खरेदी केंद्रांवरील नोंदणी प्रक्रियेतील तांत्रिक व प्रशासकीय अडचणी दूर करण्याबाबत

**(२३) * १०३४१ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदुर (जि.बुलढाणा) येथील ज्वारी उत्पादक शेतकऱ्यांना खुल्या बाजारात ज्वारीला सुमारे रुपये २,००० प्रति क्विंटल दर मिळत असताना, शासनाने ज्वारीसाठी रुपये ३,६९९ प्रति क्विंटल इतकी किमान आधारभूत किंमत (MSP) जाहीर केलेली असून, बाजारभाव व हमीभाव यामध्ये मोठी तफावत असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात धान व भरडधान्यांच्या शासकीय हमीभाव खरेदी केंद्रे शेतकऱ्यांसाठी आर्थिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची असतानाही विद्यमान नोंदणी प्रक्रियेतील तांत्रिक व प्रशासकीय अडचणींमुळे अनेक शेतकऱ्यांना नोंदणी व विक्री प्रक्रियेत अडथळे येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या वर्षांपासून ज्वारी, हरभरा आणि सोयाबीन यांसारख्या पिकांसाठी शेतकऱ्यांना स्वतःच्या मोबाईलद्वारे ऑनलाईन नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून देणे तसेच नोंदणी पूर्ण होताच संगणकीय प्रणालीद्वारे टोकन क्रमांक व शेतमाल विक्रीसाठी निश्चित करण्यात आलेला दिनांक एसएमएसद्वारे कळविण्याची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ऑनलाईन नोंदणी प्रक्रियेदरम्यान आधार कार्ड, शेतकऱ्याच्या नावावरील ७/१२ उतारा, पीकपेरा नोंद व बँक खात्याची माहिती यांची स्वयंचलित ऑनलाइन पडताळणी करण्याबाबत तसेच

किमान आधारभूत किंमत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) हे खरे आहे.

पणन हंगाम २०२५-२६ करीता ज्वारी (संकरीत) रुपये ३६९९/- तर ज्वारी (मालदांडी) रुपये ३७४९/- इतकी किमान आधारभूत किंमत केंद्र शासनाने निश्चित केलेली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत धान व भरडधान्य (ज्वारी, मका, बाजरी, रागी) पिकांसाठी शेतकरी नोंदणी ऑनलाईन प्रक्रियेद्वारे करण्यात येत आहे. यासाठी केंद्र शासनाच्या सूचनांप्रमाणे आधारबेस बायोमेट्रिक/ आयरिस स्कॅनिंग या पर्यायांचा वापर करण्यात येत आहे. नोंदणीकृत शेतकऱ्यांना खरेदीचे वेळापत्रक (Scheduling) निश्चित करुन त्याबाबत एस.एम.एस. द्वारे कळविण्यात येत आहे.

संगणकीय प्रणालीद्वारे नोंदणी करताना महसूल विभागाच्या महाभुमी संकेतस्थळावरुन ७/१२ उतारा उपलब्ध करुन घेण्यात येत आहे. ८-अ उपलब्ध करुन घेण्यासाठी तांत्रिक सहाय्य उपलब्ध करुन घेण्यात येत आहे. शेतकऱ्यांना वेळेत चुकारे अदा करण्यासाठी आधार सिडेड पेमेंट सिस्टम कार्यान्वित करण्याची शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मंगळवेढा (जि.सोलापूर) येथील गुटखा तस्करी प्रकरणी अन्न व औषध प्रशासन विभागातील अधिकाऱ्यांनी लाच मागितल्याबाबत

**(२४) * १०३४५ श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) येथे गुटखा वाहतूक करणारा ट्रक पकडल्यानंतर संबंधित वाहनावरील कारवाई टाळण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागातील अधिकाऱ्यांकडून मध्यस्थामार्फत रुपये १५ लाखांची लाच मागितल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरातील कायदा व सुव्यवस्था तसेच जनतेच्या आरोग्यास बाधा पोहोचविणाऱ्या गुटखा तस्करीसारख्या गंभीर प्रकारांवर नियंत्रण ठेवण्याऐवजी लाच मागणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर अन्न व औषध प्रशासन विभागाने कारवाई केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सांगली जिल्ह्यात देखील अन्न व औषध प्रशासन विभागातील काही अधिकाऱ्यांविरोधात गैरव्यवहाराच्या विविध प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी दोषी आढळून आलेल्या संबंधितांविरोधात शासनाने कोणती कडक कारवाई केली तसेच संबंधित अधिकाऱ्यांविरोधात विभागाने कोणती चौकशी किंवा प्रशासकीय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) सदर घटना ही माहे, मे २०२६ मधील नाही.

तथापि, मंगळवेढा, जि.सोलापूर येथे दिनांक १७/०४/२०२३ रोजी गुटख्याची वाहतूक करणाऱ्या गाडीवर गुन्हा नोंदविताना FIR मध्ये नाव न येण्यासाठी संबंधित व्यापाऱ्याकडे रुपये १५ लाखाची मागणी केल्याचे निष्पन्न होत असल्यामुळे तत्कालीन अन्न सुरक्षा अधिकारी, कोल्हापूर यांचेविरुध्द पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर यांनी लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ कलम ७ प्रमाणे क्र. ११२/२०२६, दिनांक ०४/०४/२०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

तत्कालीन अन्न सुरक्षा अधिकारी, कोल्हापूर यांचेविरुध्द सदर प्रकरणात प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशीअंती महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ चे नियम १० अन्वये विभागीय चौकशीची कारवाई करण्यात आली असून आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांनी त्यांच्या पुढील दोन वेतनवाढी त्यापुढील भावी वेतनवाढीवर परिणाम न करता रोखून ठेवण्याची शिक्षा दिनांक २२/१०/२०२४ रोजीच्या आदेशान्वये देण्यात आली आहे.

(३) सांगली जिल्ह्यात अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांविरोधात गैरव्यवहाराच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(४) तत्कालीन अन्न सुरक्षा अधिकारी, कोल्हापूर यांचेविरुध्द सदर प्रकरणात प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशीअंती महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ चे नियम १० अन्वये विभागीय चौकशीची कारवाई करण्यात आली असून आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांनी त्यांच्या पुढील दोन वेतनवाढी त्यापुढील भावी वेतनवाढीवर परिणाम न करता रोखून ठेवण्याची शिक्षा दिनांक २२/१०/२०२४ रोजीच्या आदेशान्वये देण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत तत्कालीन अन्न सुरक्षा अधिकारी, कोल्हापूर यांचेविरुध्द लाच मागितल्याच्या प्रकरणाच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर यांनी लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा क्र. ११२/२०२६, दिनांक ०४/०४/२०२६ रोजी दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने तत्कालीन अन्न सुरक्षा अधिकारी, कोल्हापूर यांनी मा.विशेष लाचलुचपत प्रतिबंधक न्यायालय, कोल्हापूर येथे फौजदारी जामीन अर्ज क्र. ३२०/२०२६, दिनांक ०४/०४/२०२६ रोजी दाखल केला असून मा.न्यायालयाने दिनांक ०७/०४/२०२६ रोजी त्यांना अंतरीम जामीन मंजूर केलेला आहे. यास्तव, सदर प्रकरणी मा.न्यायालयाकडून अंतिम आदेश प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## मुंबईत वाढत्या पार्किंग समस्या दूर करण्यासाठी दीर्घकालीन धोरण राबविण्याबाबत

**(२५)** * **१०५०२ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत वाढत्या पार्किंग समस्येबाबत दीर्घकालीन धोरण राबविण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासन विचाराधीन असून गत काही वर्षांत मुंबईतील पार्किंगची समस्या अधिक गंभीर होत असून बृहन्मुंबई महानगरपालिकेचे सार्वजनिक वाहनतळ असतानाही नो-पार्किंग झोनमध्ये गाडी पार्क केली जाते. तसेच मुंबईतील बेकायदा पार्किंगची समस्या दूर करण्यासाठी आता नो-पार्किंग झोन क्षेत्रात थर्मो

प्लास्टिकचा रंग लावण्यात येणार आहे.असून नो-पार्किंगच्या फलकाची संख्या वाढवण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नो-पार्किंग क्षेत्रांमध्ये थर्मोप्लास्टिक रंग लावण्याचा निर्णय नेमका कोणत्या अभ्यासाच्या आधारे घेण्यात आला आहे, मल्टी-लेव्हल पार्किंग प्रलंबित प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच, भविष्यात पार्किंग समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी शासनाचा एकत्रित कृती आराखडा तयार करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागरिकांसाठी परवडणारी व सुलभ पार्किंग व्यवस्था निर्माण करुन वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर शासनाने कोणती दंडात्मक कारवाई केली तसेच स्मार्ट पार्किंग, ॲप-आधारित पार्किंग व्यवस्थापन यांसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करण्याबाबत व स्थानिक रहिवाशांच्या पार्किंग हक्कांबाबत (residential parking) शासनाने कोणती धोरणात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) नो-पार्किंग क्षेत्रामध्ये लाल व काळया रंगाने कर्ब स्टोन पेंटीग करण्याचा निर्णय वाहतूक पोलीस यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने घेतला आहे.
बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत मुंबादेवी येथील मल्टीलेवल पार्किंग करण्याचे काम सद्य:स्थितीत स्थगित ठेवण्यात आले आहे. तसेच वरळी व हुतात्मा चौक येथील मल्टीलेवल पार्किंग करण्याचे काम सुरु आहे.
भविष्यात पार्किंग समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी कृती आराखडा तयार करण्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे सुरु आहे.
(३) वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या नागरिकांविरुध्द मुंबई वाहतूक पोलीसांकडून मोटार वाहन कायद्यातील तरतुदीनुसार ई-चलन कारवाई करण्यात येते. त्यानुसार नो-पार्किंग व वाहतुकीस अडथळा करणाऱ्या वाहनचालकांवर सन २०२५ मध्ये एकूण १० लाख ४८ हजार २२७ तसेच सन २०२६ मध्ये ५ लाख ५२ हजार ८६२ ई-चलन कारवाई करण्यात आली आहे.
बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून पार्किंग व्यवस्थापनाकरीता स्मार्ट पार्किंग, ॲप-आधारीत पार्किंग व्यवस्थापन कार्यान्वित करण्याबाबतची निविदा प्रक्रिया बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे वालशिंद (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील एमएमआरडीएने रस्त्याच्या बांधकामास अनियमिततेने मंजुरी दिल्याबाबत

**(२६) * १०५३६ श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील मौजे वालशिंद (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील सर्व्हे क्र. ११/७/अ, १२/३/अ/३, १२/३/अ/५, १२/४, १२/५, १३/१/अ/१/अ, १३/१/अ/१/ड या जागेवर एमएमआरडीए तर्फे दिनांक २१ एप्रिल, २०२३ रोजी १८ मीटर रुंदीच्या रस्त्याच्या आधारे बांधकामास परवानगी देण्यात आली असून,

सदर रस्ता अनधिकृत असल्याबाबत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांनी दिनांक १० सप्टेंबर, २०२६ रोजीच्या पत्राद्वारे निदर्शनास आणून दिले असून सदर रस्त्याच्या अनधिकृत वापर बंद करण्याचे निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी परवानगी मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांनी हेतुपुरस्पर रस्ता अनधिकृत असल्याचे वरिष्ठ तसेच प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणली नसून १८ मीटर रुंदीचा रस्ता मूळ जमीन मालकाच्या जागेतून न जाता शेजारील जमिनी मालकाच्या खाजगी जागेतून जात असतानाही त्या शेजारील जमीन मालकाची लेखी परवानगी अथवा ना-हरकत प्रमाणपत्र न घेता अशा अनधिकृत/बेकायदेशीर प्रवेशाच्या आधारे परवानगी देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जागेतून जाणारा ४.५ मीटर रुंदीचा रस्ता् व इतर रस्ते मंजूर विकास योजनेत दर्शविण्यात आलेले आहेत त्याचप्रमाणे सदर १८ मीटर रुंदीचा रस्ता एमएमआरडीएच्या मंजूर विकास योजनेत समाविष्ट नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रस्तावित १८ मीटर रुंदीचा रस्ता एमएमआरडीएच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. जी-४४ मधून जात असताना, सदर आरक्षण मूळ ठिकाणाहून बाजूला सरकवून इतरत्र दर्शविण्यात आले व त्यानुसार मंजुरीकरीता प्रस्तावित करुन त्यास चुकीच्या पध्दतीने मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर बांधकाम प्रकल्पातील गाळयांच्या विक्रींमुळे खरेदीदारांची फसवणूक होत असल्याची बाब तसेच नियमांचे उल्लंघन होत असल्याच्या तक्रारी यासंदर्भांत शासनाने चौकशी करुन संबंधित जबाबदार अधिकारी व व्यक्तींवर कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, सदर जागेवर चुकीच्या पध्दतीने देण्यात आलेली बांधकाम परवानगी रद्द करण्याबाबत एमएमआरडीए अथवा शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

सदर जमिनीवरील प्रस्तावित गोदामांकरीता विकास परवानगी प्रस्तावास प्राधिकरणाने दिनांक २१ एप्रिल, २०२३ रोजी मंजुरी दिली आहे. त्यामध्ये दिनांक २९ जून, २०२० रोजीच्या DSLR ने दर्शविलेल्या मोजणी नकाशाप्रामणे १८ मी. रुंदीचा अस्तित्वातील रस्ता दर्शविलेला आहे. तथापि, सदरचा अस्तित्वातील रस्ता हा मंजूर विकास योजनेचा भाग नाही.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग यांचेकडून दिनांक १० सप्टेंबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये मौ. वालशिंद, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील सर्व्हे क्र. ११ मधून राष्ट्रीय महामार्गापासून अनधिकृत रस्ता घेण्यात आल्याचे नमूद केले आहे.

(२) अर्जदाराने प्रस्तावित प्रकल्पाकरीता १८ मी. रुंदीच्या पोहोच रस्त्याच्या उपलब्धतेबाबत दिनांक १७ मे, २०२२ रोजीचे हमीपत्र मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडे सादर केलेले आहे. तसेच अस्तित्वातील रस्त्याच्या उपलब्धतेबाबत अर्जदाराचे, वास्तुविशारद/ अभियंता यांनी दिनांक १७ मे, २०२२ रोजीच्या पत्रान्वये जबाबदारी स्वीकारलेली आहे. त्यानुसार, सदरचा १८ मी. रुंदीचा पोहोच रस्ता गृहित धरुन अर्जदारास विकास परवानगी देण्यात आलेली आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(३) होय खरे आहे.

(४), (५) व (६) अंशत: खरे आहे.

सदरहु अस्तित्वातील रस्त्याने विकास योजनेतील ‘आरक्षण क्र.४४, बगीचा’ बाधित होत असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येते. त्यानुसार, प्राधिकरणाने दिनांक २० मे, २०२६ रोजीच्या पत्रान्वये विकासकाकडून सदर प्रकल्पास पर्यायी रस्त्याच्या उपलब्धतेबाबत कागदपत्रांसह स्पष्टीकरण अपेक्षिलेले आहे. तसेच, सदर अपेक्षिलेले स्पष्टीकरण प्राधिकरणास विहीत मुदतीस प्राप्त न झाल्यास प्राधिकरणाने दिलेली विकास परवानगी रद्द करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल, असेही विकासकास सदर पत्रान्वये कळविले आहे. त्यावर विकासकाने दिनांक ०३ जून, २०२६ रोजीच्या पत्रान्वये स्पष्टीकरण सादर केलेले आहे. तथापि, सदर स्पष्टीकरणासोबत आवश्यक माहिती व कागदपत्रं न सादर केल्याने, विकासकाने पोहोच रस्त्याबाबत सूचविलेल्या पर्यायाबाबतची माहिती प्राधिकरणास सादर करणेबाबत विकासकास दिनांक १७ जून, २०२६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार प्रकरणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने पुढील कार्यवाही करणे अभिप्रेत आहे.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर येथील कचरा डेपोतील कचऱ्याचे बायोमायनिंग पध्दतीने प्रक्रिया करणाऱ्या एजन्सीने बोगस पद्धतीचे काम केल्याबाबत

**(२७) * १०५३८ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने रुपये ६७ कोटी एवढी रक्कम खर्च करुन नारेगाव, चिखलठाणा, पडेगाव आणि हर्सूल परिसरात सुमारे दहा लाख मॅट्रिक टन कचऱ्यांचे बायोमायनिंग पध्दतीने प्रक्रिया करणाऱ्या एजन्सीने बोगस पद्धतीचे काम करुन देयक घेतले असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पडेगाव (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील कचरा डेपोमधून निघणाऱ्या धुरामुळे नागरिकांना विविध आजारांना सामोरे जावे लागत असल्याने येथील परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून यामुळे रहिवाशांना सतत सर्दी, खोकला, घशात जळजळ, डोळयातून पाणी येणे अशा अनेक तक्रारी, विशेषत: लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांना दमा व ॲलर्जी इ.आजारांचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी केलेल्या कामांमध्ये रुपये ७ कोटी एवढ्या रक्कमेचा गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले असून सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त एजन्सीविरुध्द कारवाई करुन त्यांना अदा करण्यात आलेले कोट्यवधी रुपयांची वसुली करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली,

(४) असल्यास, वाळूज येथील निवासी परिसरातील भूखंड क्रमांक ६०० जवळील हजारो गोरगरीब व मध्यमवर्गीय नागरिकांच्या वास्तव्य असलेल्या मोकळया जागेवर सिडको प्रशासनाने अनियमिततेच्या माध्यमातून कचरा संकलन आणि पक्के बांधकाम करुन घनकचरा व्यवस्थापन सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक नागरिकांनी सिडको प्रशासनाकडे घनकचरा प्रकल्प निवासी वसाहतीपासून दूर जागी आरक्षित करण्याबाबत वारंवार लेखी तक्रारी दाखल करुन देखील याकडे दुर्लक्ष

केल्याने नागरिकाना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन येथील कचरा डेपो त्वरीत बंद करुन नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने योग्य ती व्यवस्था करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(७) असल्यास, गोरगरीब व मध्यमवर्गीय नागरिकांच्या वास्तव्य असलेल्या मोकळया जागेवर जागेवर सिडको प्रशासनाने कंचरा संकलन आणि पक्के बांधकाम करुन सुरु केलेल्या घनकचरा व्यवस्थापनास जबाबदार असणाऱ्या संबंधितांविरुध्द कारवाई करण्यासह वाळूज येथील मोठ्या जागेवर गोरगरीब आणि मध्यमवर्गीयांना हक्काचे घर देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेमधील पडेगाव येथील कचऱ्यास उन्हाळयातील उच्चतापमानामुळे काही भागात आग लागली होती. सदर आगीमुळे परिसरात काही काळ धुर पसरला होता.तथापि, सदर आगीवर लवकरच नियंत्रण आणण्यात आले होते. यासंदर्भात महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून आरोग्य सर्वेक्षण तसेच आरोग्य शिबीर घेण्यात आले. यामध्ये तुरळक नागरिकांना नियमित आढळणाऱ्या आजारांसोबत श्वसनाचे आजार, डोळयात जळ-जळ, खोकला व इतर त्रास आढळून आला असून सदर रूग्णांना आवश्यक ते उपचार देण्यात आले.
(३) हे खरे नाही.
(४) अंशतः खरे आहे.

सन २०१५ अखेर लोकसंख्येच्या प्रमाणात जमा होणारा दैनंदिन कचरा संकलित करून त्याची विल्हेवाट लावण्याकरीता स्वतंत्र कचरा डेपोचे नियोजन नसल्यामुळे सिडको प्रशासनाकडून तूर्त नगर-१ मधील भूखंड क्र. ६०५ लगत संरक्षण भिंतीच्या आत परिसरातील घरगुती ओला/सुका कचरा व निरूपयोगी प्लॅस्टीक वर्गीकृत करून वाळूज एमआयडीसी बायोगॅस व खत निर्मिती करणाऱ्या खाजगी एजन्सीला ओला कचरा पुरविण्यात येत आहे. तसेच दैनंदिन जमा होणारा टाकाऊ कचरा (Inert Waste) हा महानगरपालिकेच्या पूर्वपरवानगीने पडेगांव येथील कचरा डेपोमध्ये वाहतूक करण्यात येत आहे.
(५) अंशतः खरे आहे.
(६) वाळूज प्रकल्पासाठी दिनांक २४/०६/२०२५ रोजीचे अधिसुचनेनुसार छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर यांची विशेष नियोजन प्राधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. अधिसूचनेनुसार नियोजित प्राधिकरणास हस्तांतरण होईपर्यंत दैनंदिन भौतिक व सामाजिक सोयीसुविधा देखभाल व व्यवस्थापन इत्यादी सिडकोकडून करण्यात येत आहे.
घनकचऱ्यासाठी स्वतंत्र संकलन केंद्र तयार करण्याकरीता सिडको प्रशासनाकडून कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये आरोग्य सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(२८) * ८९२१ श्री.श्रीकांत भारतीय, श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील वाढती लोकसंख्या पहाता गंभीर आजारावरील उपचारासाठी शहरात एकही सुसज्ज शासकीय मल्टीस्पेशलिटी रुग्णालय नसून हृदयविकार, गंभीर अपघात किंवा मेंदूशी संबंधित उपचारांसाठी रुग्णांना आजही मुंबईतील नायर, केईएम किंवा सायन रुग्णालयात जावे लागत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई-विरार महानगरपालिकेच्या नालासोपारा येथील सर डी. एम. पेटीट रुग्णालयात १० विविध प्रकारची मुदत संपलेली (Expired) औषधे निदर्शनास आली असून सदर मुदत संपलेली औषधे आणि उपयोगात असलेली औषधे एकाच ठिकाणी ठेवून ती गरीब रुग्णांना दिली जात असल्याची बाब माहे मार्च, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समर्थन' संस्थेने दिनांक ५ मे, २०२६ रोजी सादर केलेल्या निवेदनानुसार, अतिरिक्त आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील चौकशी समितीने अहवाल सादर करून एक महिन्याचा कालावधीनंतरही दोषींवर कोणतीही कायदेशीर कारवाई करण्यात आली नसून प्रशासनाकडून केवळ ‘कारणे दाखवा’ नोटीस बजावून दोषींना पाठीशी घालण्याचे काम केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशी अहवालात नमूद केल्याप्रमाणे कालबाह्य औषधांचा साठा कसा तयार झाला व त्यामागील प्रशासकीय त्रुटी कोणत्या आहेत, याचा तपशील काय आहे, अशा प्रकारच्या घटना भविष्यात घडू नयेत यासाठी राज्यातील सर्व शासकीय व महानगरपालिका रुग्णालयांमध्ये औषध साठा व्यवस्थापनाबाबत सुधारित उपाययोजना व नियंत्रण यंत्रणा लागू करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, डॉक्टरांची अनुपस्थिती, क्ष किरण तज्ञाचा अभाव आणि रुग्णांना मिळणारी वागणूक याबाबत नागरिकांच्या तक्रारी असून रुग्णांच्या जिवाशी खेळणाऱ्या या प्रकरणाची शासनाने दखल घेऊन जबाबदार असणाऱ्या दोषी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महानगरपालिकेची ०७ रुग्णालये व २ माता बाल संगोपन केंद्र कार्यरत आहेत. याठिकाणी विविध आजारांवर तपासणी व उपचार दिले जातात. तसेच खाजगी ३२८ रुग्णालये असून यापैकी ४ मल्टीस्पेशालिटी रुग्णालये आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

वसई-विरार महानगरपालिकेच्या नालासोपारा येथील सर डी. एम. पेटीट रुग्णालयात १० विविध प्रकारची मुदत संपलेली (Expired) औषधे निदर्शनास आली होती. ही औषधे औषध भंडारमध्ये एकत्रित करुन ठेवण्यात आलेली होती. या औषधांपैकी कोणतीही मुदतबाहय औषधे गरीब रुग्णांना देण्यात आलेली नाहीत.

(३) हे खरे नाही.

महानगरपालिका स्तरावर सर.डी.एम. पेटीट, रुग्णालयातील तक्रारीबाबत अतिरिक्त आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली ४ सदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती. या समितीने दिलेल्या अहवालानुसार कार्यरत सर्व वैद्यकीय अधिकारी, औषधनिर्माता यांना नोटीस बजावण्यात आलेली होती. त्यांचा खुलासा विचारात घेता, ते दोषी दिसून आले नाही. तसेच, ०१ औषधनिर्माता यांची इतर ठिकाणी बदली करण्यात आलेली आहे.

(४) चौकशी अहवालात नमूद केल्याप्रमाणे प्रशासकीय त्रुटी भविष्यात घडू नये यासाठी सुधारित उपाययोजना कार्यान्वित केलेली आहे. तसेच सेंट्रल फार्मासी भांडार स्थापन करणे, औषधांची योग्य मांडणी करणे, संगणकीय प्रणाली विकसित करणे इ. उपाययोजना महानगरपालिकेकडून करण्यात आलेल्या आहेत.

(५) वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागाने क्ष-किरण तज्ञ उपलब्ध होणेकरीता फेब्रुवारी, २०२०, जानेवारी, २०२१, जानेवारी, २०२३, नोव्हेंबर, २०२३ तसेच जून, २०२६ मध्ये जाहिरात दिलेली होती परंतु त्यास प्रतिसाद मिळाला नाही. बंधपत्रित क्ष-किरण तज्ञ उपलब्ध होणेकरीता संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयास माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये विनंती करण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या रुग्णालयात मानद क्ष-किरण तज्ञ नियमित काम करीत असून, रुग्णांची गैरसोय होत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर ते गोवा शक्तीपीठ महामार्गाच्या सुधारित आराखड्यास मंजुरी दिल्याबाबत

**(२९) * ९२१२ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने, श्री.सदाशिव खोत, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर ते गोवा शक्तीपीठ महामार्गाच्या सुधारित आखणीनुसार दिग्रज (जि.वर्धा) ते बांदा (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) पर्यंत ८५६.७६ किमी लांबीच्या या महामार्गाच्या सुधारित आराखड्याच्या रेखांकनाला शासनाने दिनांक ३ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यासुमारास मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नव्या रेखांकनानुसार गावनिहाय अधिसूचना शासन प्रसिध्द करित असताना हा महामार्ग दिग्रज ते बांदापर्यंत ८५६.७६ किमी लांबीचा या महामार्गाच्या रेखांकनाला मान्यता दिली असून भूसंपादन केलेल्या जमिनीस मोबदला देताना कोणते निकष लावण्यात येणार आहेत तसेच या शक्तीपीठ महामार्गाच्या कामाला कधीपासून सुरुवात करण्यात येणार आहे सुधारित आराखड्याचे स्वरुप काय आहे व त्यास मान्यता देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, राज्यातील तीर्थक्षेत्रे जोडणाऱ्या शक्तीपीठ महामार्ग हा सुधारित आराखड्यानुसार वर्धा, यवतमाळ, बीड व लातूर या जिल्ह्यांमधील मूळ आखणी कायम ठेवून नांदेड, हिंगोली, परभणी, धाराशिव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमधील मार्गात बदल करण्यात आला आहे तसेच सातारा जिल्ह्याचा त्यात नव्याने समावेश करण्यात आला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील दळणवळण (कनेक्टिव्हिटी) आणि आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी शासनाने शक्तीपीठ एक्सप्रेसवेच्या सुधारित आराखड्याला मंजुरी दिली असून या नव्या आराखड्यातील

आक्षेप लक्षात घेऊन महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत काय,त्याचे स्वरुप काय आहे, प्रकल्पाची लांबी, खर्च आणि भौगोलिक विस्तार वाढला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सुधारित आराखड्यामुळे शासनावर अतिरिक्त आर्थिक बोजा येणार आहे काय, सदर अतिरिक्त बोजा भरून काढून सदर शक्तीपीठ महामार्गाच्या कामाला सुरुवात करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नागपूर ते गोवा शक्तीपीठ महामार्गाच्या सुधारित आखणीस शासनाने दिनांक ०१/०४/२०२६ रोजी मान्यता प्रदान केली आहे, ही बाब खरी आहे.

(२) प्रकल्पासाठी आवश्यक भूसंपादन करताना महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियम, मार्गदर्शक सूचना व धोरणांनुसार भरपाई निश्चित करण्यात येईल. भरपाई निश्चित करताना बाजारमूल्य, गुणक (Multiplier), तसेच पात्र पुनर्वसन व पुनर्स्थापना लाभांचा विचार करण्यात येईल.

प्रकल्पाच्या कामास गती देण्यासाठी भूसंपादन, पर्यावरणीय व वनविषयक मंजुऱ्या, विविध वैधानिक परवानग्या, सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) अंतिम करणे, निविदा प्रक्रिया राबविणे व इतर पूर्वतयारीची कामे समांतरपणे हाती घेण्यात येत असून आवश्यक मंजूऱ्या व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पाच्या बांधकामास टप्प्याटप्प्याने प्रारंभ करण्यात येणार आहे.

प्रकल्पाच्या मंजूर आखणीत स्थानिक लोकप्रतिनिधी, शेतकरी व नागरिकांकडून प्राप्त झालेल्या सूचना, आक्षेप व मागण्यांचा विचार करुन हिंगोली, नांदेड, परभणी, धाराशिव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर व सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील काही भागांमध्ये आखणीत बदल करुन सुधारीत आराखडा तयार करण्यात आला. या बदलांमुळे काही नवीन तालुके व क्षेत्रांचा समावेश नव्या आराखड्यात करण्यात आला असून स्थानिक मागण्यांनुसार मार्गरेषेत आवश्यक सुधारणा करण्यात आल्या आहेत. तसेच पश्चिम घाट परिसरातील पूर्वी प्रस्तावित असलेल्या सुमारे २१ कि.मी. लांबीच्या एकाच बोगद्याऐवजी रस्ते सुरक्षितता, बांधकाम सुलभता व देखभाल खर्च विचारात घेऊन ०६ स्वतंत्र बोगदे प्रस्तावित करण्यात आले आहेत.

सुधारित आराखड्यानुसार प्रकल्पाची एकूण लांबी ८५६.७६५ कि.मी. असून प्रकल्पाचा अंदाजित खर्च किंमत रुपये १,०१,४०५ कोटी इतका अपेक्षित आहे. प्रकल्पाच्या लांबी, खर्च आणि भौगोलिक विस्तारामध्ये वाढ झालेली आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे आहे.

(५) सुधारित आखणीमुळे प्रकल्पाच्या लांबीमध्ये वाढ झाल्याने तसेच काही नवीन भागांचा समावेश, अतिरिक्त संरचना, बोगदे व इतर अभियांत्रिकी कामे प्रस्तावित करण्यात आल्याने प्रकल्पाच्या अंदाजित खर्चामध्ये वाढ होणे अपेक्षित आहे. तथापि, सदर खर्च हा राज्याच्या दीर्घकालीन पायाभूत सुविधा विकास, प्रादेशिक संतुलित विकास, धार्मिक पर्यटन व आर्थिक वाढ यांना चालना देण्याच्या दृष्टीने करण्यात येणारी गुंतवणूक असून त्यानुसार आवश्यक वित्तीय नियोजन करण्यात येत आहे.

प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी निधी उभारणीच्या विविध पर्यायांचा विचार करण्यात येत असून, त्यामध्ये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत (MSRDC) कर्ज उभारणी, वित्तीय संस्थांकडून

दीर्घकालीन निधी उपलब्ध करणे, टप्प्याटप्प्याने निधीचे नियोजन करणे तसेच आवश्यकतेनुसार इतर वित्तीय पर्यायांचा अवलंब करणे यांचा समावेश आहे.

सुधारित मंजूर आखणी नुसार सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगती पथावर आहे याशिवाय, प्रकल्पाच्या कामास गती देण्यासाठी भूसंपादन, पर्यावरणीय व वनविषयक मंजुऱ्या, विविध वैधानिक परवानग्या, सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) अंतिम करणे, निविदा प्रक्रिया राबविणे व इतर पूर्वतयारीची कामे संबंधित यंत्रणांमार्फत समांतरपणे हाती घेण्यात येत आहेत. आवश्यक मंजुऱ्या व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पाच्या बांधकामास टप्प्याटप्प्याने प्रारंभ करण्यात येणार आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेच्या बाणेरमधील पीपीपी तत्वावरील रुग्णालयात रुग्णांना मोफत उपचार नाकारल्याबाबत

**(३०) * ८८८२ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाणेर (जि.पुणे) येथील महानगरपालिकेच्या इमारतीत सुरू असलेल्या पीपीपी तत्त्वावरील रुग्णालयात महानगरपालिका क्षेत्रातील रुग्णांना कोणतीही सवलत दिली जात नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयात एनआयसीयूमध्ये महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचे कुटुंबिय तसेच महात्मा फुले योजनेच्या लाभार्थ्यांना उक्त योजनेची कागदपत्रे दिली, तरीही त्यातून उपचार न करता सर्व देयक भरण्याचा आग्रह रुग्णालयाकडून करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिकेच्या इमारतीत सुरू असलेले पीपीपी तत्त्वावरील रुग्णालय हे महानगरपालिकेने केवळ ५०० रुपयांच्या नोटरीवर विना भाडे चालविण्यासाठी दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची दखल घेत महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने संबंधित रुग्णालयाला नोटीस बजावली आहे काय, हा पीपीपी प्रकल्प महानगरपालिकेच्या मालकीच्या इमारतीत सुरू असून, नियमानुसार येथे गरीब रुग्णांना मोफत किंवा सवलतीच्या दरात (उदा. CGHS दर) उपचार मिळणे अपेक्षित असताना, ते नाकारले जात आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, बाणेर येथील पुणे महानगरपालिकेच्या इमारतीत सुरू असलेल्या पीपीपी तत्त्वावरील रुग्णालयात महात्मा फुले योजनेची कागदपत्रे देऊनही संपूर्ण देयकाचा भरण करण्याच्या प्रकरणाची महानगरपालिकेने चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश द्यावे तसेच शहरातील सर्व रुग्णालयांना शासकीय योजनांचा लाभ मिळावा
या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) अंशत: खरे आहे.

महानगरपालिका सदस्यांनी महासभेमध्ये उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने आरोग्य कार्यालयामार्फत दिनांक ७/५/२०२६ रोजीच्या पत्रान्वये जे.टी. फाऊंडेशनमार्फत चालविण्यात येणाऱ्या रुग्णालयांना नोटीस बजावली आहे. गरीब रुग्णांना मोफत किंवा सवलतीच्या दरात (उदा. CGHS दर) उपचार नाकारले जात नाहीत.

(५) सदर हॉस्पिटलबाबत महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत चार सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली असून चौकशी समितीने आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना अहवाल सादर केला आहे. तसेच, एम.जे.पी.जे.वाय. योजनेंतर्गत ५७६, शहरी गरीब वैदयकिय सहाय्यक योजनेंतर्गत ११ व आर.बी.एस.के. २४२ रूग्णांनी लाभ घेतला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर महानगरपालिकेच्या सर्व्हेक्षणानुसार अनेक सार्वजनिक बसच्या चेसीस व साहित्य गहाळ झाल्याबाबत

**(३१) * ९८३९ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरूत्थान योजनेंतर्गत नागपूर महानगरपालिकेला शहरांतर्गत सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसाठी एकूण २३७ ज्या बसेस मिळाल्या या बस सेवेचे व्यवस्थापन व संचालन हेसा सिटी बस सर्व्हिसेस, आर. के. बस सिटी सर्व्हिसेस, व ट्रॅव्हल्स टाईम सिटी सर्व्हिसेस या कंपन्याकडे जबाबदारी दिली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर महानगरपालिकेने केलेल्या सर्व्हेक्षणानुसार अनेक बसच्या चेसीस व साहित्य गहाळ झाल्या प्रकरणी गुन्हा दाखल करुन या तिन्ही ऑपरेटर्सकडून रुपये ३२.३९ लाख दंड महानगरपालिकेने वसुल करण्याचे निश्चित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेच्या परिवहन विभागाने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून या सर्व बसेसचे मूल्यांकन करुन तिन्ही कंपन्यांनी वसुलीची रक्कम विहित कालावधीत महानगरपालिकेकडे वर्ग न केल्यास आगामी देयकातून महानगरपालिकेकडे वर्ग करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरूत्थान योजनेंतर्गत नागपूर महानगरपालिकेला प्राप्त झालेल्या बसेसचे १५ वर्ष पूर्ण झालेल्या बसेसची निर्लेखन प्रक्रिया महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत सर्वेक्षण करण्यात येऊन पूर्ण करण्यात आली.

सदर सर्वेक्षण अहवालानुसार बसमधील गहाळ आढळलेल्या साहित्याची किंमत निश्चित करण्यात येऊन नागपूर महानगरपालिकेच्या परिवहन समितीने दिनांक ०९ एप्रिल, २०२६ रोजीच्या ठरावानुसार तिन्ही बस ऑपरेटरवर दंड वसुलीची प्रक्रिया करण्याचे निर्देशित केले.

त्यानुसार, मे. हेसा सिटी बस सर्व्हिसेस यांच्याकडून रुपये १६,९९,४९०/-, मे. आर. के. बस सिटी सर्व्हिसेस यांच्याकडून रुपये ३,७७,९२०/- आणि मे. ट्रॅव्हल्स टाईम सिटी बस सर्व्हिसेस यांच्याकडून रुपये ११,६२,३००/- असा एकूण मिळून रुपये ३२,३९,७१० /- इतकी दंडाची रक्कम संबंधित ऑपरेटरकडून माहे एप्रिल, २०२६ च्या देयकातून दिनांक १२ मे, २०२६ रोजी वसूल करण्यात आली असल्याचे नागपूर महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषत: नाशिक जिल्ह्यातील रस्त्यालगतच्या धोकादायक विहिरींना संरक्षक कठडे बसविण्याबाबत

**(३२)** * **९६१७ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिंडोरी (जि.नाशिक) तालुक्यात एका खासगी शिकवणीच्या स्नेहसंमेलनातून घरी निघालेल्या कुटुंबाची मोटार रात्री रस्त्यालगतच्या विहिरीत कोसळून सहा बालकांसह ९ जणांचा मृत्यू झाल्याची घटना माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कॉलनी रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या या धोकादायक विहिरीला कठडा नसल्याने व रस्त्याच्या मध्यभागी ती असल्याने हा अपघात झाला, तसेच विहीर बुजवण्याची मागणी वर्षानुवर्षे स्थानिक नागरिकांकडून होत असतानाही याकडे प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात अशा प्रकारच्या रस्त्यालगतच्या उघड्या व असुरक्षित विहिरींची नोंद घेण्याची व त्यांना संरक्षक कठडे बसविण्याची किंवा बुजविण्याची कोणतीही प्रभावी यंत्रणा कार्यरत नसल्याने वारंवार असे जीवघेणे अपघात होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिंडोरी तालुक्यात मोटार विहिरीत कोसळून नऊ जण मृत्यूमुखी पडण्याच्या या घटनेच्या कारणांची शासनाने चौकशी केली आहे काय, विहिरीच्या सुरक्षेचा अभाव आणि रस्त्यालगतची विहीर यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, विहीर बुजवण्याची कार्यवाही प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त घटनेची दखल घेऊन अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकरीता राज्यातील नाशिक जिल्ह्यासह अन्य जिल्ह्यातील रस्त्यालगतच्या सर्व धोकादायक उघड्या विहिरींचे सर्वेक्षण करून त्यांना तातडीने संरक्षक कठडे बसविणे किवा बुजविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे,

सदरची घटना दिनांक ०३ एप्रिल, २०२६ रोजी घडली आहे.

(२) अंशतः खरे आहे,

सदर विहिर बुजविण्यासंदर्भात स्थानिक नागरिकांकडून जिल्हाधिकारी, नाशिक अथवा नगरपंचायत दिंडोरी यांच्याकडे कोणतीही मागणी वजा निवेदन प्राप्त झालेले नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) सदर प्रकरणी मुख्याधिकारी, सिन्नर नगरपरिषद यांच्या अध्यक्षतेखालील चौकशी समितीने जिल्हाधिकारी, नाशिक यांना दिनांक २८ एप्रिल, २०२६ रोजी सादर केलेल्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने, तत्कालीन मुख्याधिकारी, तत्कालीन शहर अभियंता व तत्कालीन लेखापाल, दिंडोरी नगरपंचायत यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

तसेच ७/१२ उताऱ्यावरील विहिरीची नोंद न घेणारे तत्कालीन मंडळ अधिकारी (सेवानिवृत्त) व तत्कालीन ग्राम महसूल अधिकारी (सेवानिवृत्त) यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिनांक १२ जून, २०२६ च्या पत्रान्वये प्रस्तावित करुन प्रस्ताव विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या कार्यालयास सादर केला आहे.

सदर अपघात प्रकरणी विहिर मालक व मोटार वाहनचालक यांच्यावर दिंडोरी पोलीस ठाणे येथे दिनांक ०४ एप्रिल, २०२६ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सद्य:स्थितीत सदर विहिर दिंडोरी नगरपंचायतीमार्फत बुजविण्यात आली आहे.

(५) अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकरीता रस्त्यांलगतच्या सर्व धोकादायक उघड्या विहिरीचे सर्वेक्षण करुन त्यांना तातडीने संरक्षक कठडे बसविण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कार्यवाही प्रस्तावित आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## म्हाडाच्या कोकण मंडळांतर्गत २०% सर्वसमावेशक योजनांतर्गत घरे देण्यास विकासकांकडून टाळाटाळ होत असल्याबाबत

**(३३) * ९६७४ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.योगेश टिळेकर, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती चित्रा वाघ, श्री.विक्रांत पाटील, श्री.संजय खोडके, श्री.पंकज भुजबळ, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या कोकण मंडळांतर्गत चार महानगरपालिका (ठाणे, विरार, नवी मुंबई व कल्याण-डोंबिवली) क्षेत्रात चार हजार चौरस मीटरच्या भूखंडावर उभ्या राहणाऱ्या घरांपैकी २०% सर्वसमावेशक योजनांतर्गत घरे सर्व सामान्यांकरीता म्हाडा हाऊसिंग स्टॉकच्या माध्यमातून देणे बंधनकारक असताना विकासकाने सदर नियमाचे उल्लंधन केले असल्याची बाब माहे मार्च, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महारेरा प्राधिकरणाच्या आकडेवारीनुसार, सदर महानगरपालिका क्षेत्रात ८०२ गृहनिर्माण प्रकल्प सुरु असल्याचे व त्यापैकी केवळ आठ जणांनी (विकासक) म्हाडाला घरे देण्याचा प्रस्ताव दिला असून केवळ ८० घरे उपलब्ध होत आहेत व उर्वरित विकासकांनी त्याबाबत अद्याप काहीच कळविले नसल्याचे दिनांक १४ मार्च, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, म्हाडाला घरे मिळाल्याशिवाय महानगरपालिकांनी बांधकाम पूर्णत्वाचा दाखला रोखून धरण्याची कारवाई केली नसून शासनाने या संपूर्ण अनियमिततेची चौकशी करावी आणि विकासक तसेच अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी मा.लोकप्रतिनिधींनी त्यांच्या दिनांक २८ एप्रिल, २०२६ रोजीच्या पत्रान्वये शासनाला केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर नियमांचे उल्लंघन केलेल्या विकासकाविरुध्द युडीसीपीआर मधील कायद्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच म्हाडाकडून प्रत्यक्ष प्रकल्पाचे ठिकाणी जाऊन तपासणी करण्याच्या दृष्टीने महारेरा प्राधिकरणाची याबाबतची भूमिका काय आहे व त्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) ठाणे, विरार, नवी मुंबई व कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामध्ये एकीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR-२०२०) मधील विनियम ३/०८/२ मधील तरतूदीनुसार २०% सर्वसमावेशक योजनांतर्गत १९४ प्रकल्प मंजूर असून त्यामधील योजनांतर्गत प्राप्त होणाऱ्या सदनिकांची संख्या १००३१ इतकी आहे. त्यापैकी सर्वसमावेशक योजनांतर्गत कोंकण मंडळास ५०१६ सदनिका प्राप्त झाल्या असून त्यापैकी ४१९९ सदनिकांची संगणकीय सोडत काढण्यात आली असून, ऊर्वरित सदनिकांची संगणकीय सोडत नियोजित आहे.
(३) UDCPR विनियम क्र. ३/०८/२ (b)(ii) मधील तरतूदीनुसार महानगरपालिका क्षेत्रामध्ये Inclusive Housing अंतर्गत प्राप्त होणाऱ्या बांधीव सदनिकास जोपर्यंत भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त होत नाही तोपर्यंत संबंधित गृहप्रकल्पांतील इतर सदनिकांना भोगवटा प्रमाणपत्र महानगरपालिकेव्दारे प्रदान करण्यात येत नाही.
(४) अशी बाब विवक्षितपणे निदर्शनास आल्यास नियमोचित कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शहरांमधील मोकाट श्वानांची नसबंदी व लसीकरण मोहीम अधिक प्रभावीपणे राबविण्याबाबत

**(३४) * ९१६० डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.योगेश टिळेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेकडून शहराच्या विविध भागांमध्ये भटक्या श्वानांवर लसीकरण व नसबंदी आणि शस्त्रक्रिया करणेसाठी मोठ्या प्रमाणात निधी खर्च होऊनही पुणे शहरातील विविध भागांमध्ये सहा महिन्यांत १७ हजार ६३९ तर दोन महिन्यांत सुमारे साडेसहा हजार नागरिकांचा श्वानांनी चावा घेतल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर शहरात गत तीन वर्षांत दर तासाला एका नागरिकाला श्वानांनी चावा घेतल्याचे व जानेवारी, २०२१ ते फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत ४४,६६० जणांना श्वानांनी चावा घेऊन ९,९४६ जण जखमी झाल्याची तर सन २०२३ ते २०२५ या तीन वर्षांत रेबीज श्वान चावण्याने ८ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागपूर महानगरपालिकेने मे,२०२३ पासून माहे फेब्रुवारी, २०२६ पर्यंत शहरातील केवळ ६९,३२९ श्वानांवर नसबंदी शस्त्रक्रिया केली असताना मोकाट श्वानांची संख्या दीड लाखांवर असल्याने नसबंदी मोहीम अत्यंत अपुरी व अपयशी ठरली असून नागपुरातील भरतनगर भागात माकडांचा मोठा

हैदोस असतानाही महानगरपालिकेकडून उपाययोजना केली जात नाही तसेच श्वान नसबंदीसाठी नियुक्त केलेल्या कंपन्यांकडून कारवाई होत नसल्यामुळे शासकीय निधीचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबई शहर व उपनगरामध्ये भटक्या श्वानांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत असून मोठ्या प्रमाणात लहान मुलांवर हल्ला करण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असून या भटक्याश्वानांकरीता श्वानगृह बांधण्याची मागणी मुंबईकरांनी केली असून याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, राज्यातील मुंबई, नागपूर व पुण्यासह अन्य शहरात मोकाट श्वानांच्या नसबंदी मोहिमेला गती देऊन नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कठोर व कायमस्वरूपी उपाययोजना करण्याबाबत शासनाने तातडीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

पुणे महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये श्वान, मांजर व माकड यांनी दंश केलेल्या नोंदी घेण्यात येतात. सदर नोंदींनुसार जानेवारी, २०२६ ते मे, २०२६ दरम्यान १६,१५५ श्वानांनी दंश केलेल्या घटना घडल्या आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.

भारतीय जिव जंतू कल्याण मंडळ, चेन्नई यांची मान्यता प्राप्त असलेल्या मे.व्हेट्स फॉर ॲनिमल, सातारा; मे.कृष्णा ॲनिमल वेलफेअर सोसायटी, हैद्राबाद (पुणे गोरेवाडा सेंटर), मे.स्वातंत्र सोसायटी फॉर ॲनिमल, वरूड या तीन संस्थांव्दारे नागपूर महानगरपालिकेमध्ये भटक्या श्वानांची नसबंदी व लसीकरण करण्यात येते. या संस्थांव्दारे सन २०२३ ते फेब्रुवारी, २०२६ दरम्यान ७५,७६४ इतक्या श्वानांची नसबंदी व लसीकरण करण्यात आले आहे.

भरत नगर, नागपूर व इतर परिसरात माकडाचा बंदोबस्त करण्याकरीता नागपूर महानगरपालिका व नागपूर वन विभाग, नागपूर यांच्याकडून संयुक्त कार्यवाही करण्यात येते.
(४) मा.सर्वोच्च न्यायालयाने भटक्या श्वानांच्या संदर्भात वेळोवेळी दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेतील आणिक गाव आणि मुलुंड येथे व महाराष्ट्र शासनाच्या मालवणी येथे श्वान निवारागृहे स्थापित करण्याचे प्रस्तावित आहे.
(५) मा.सर्वोच्च न्यायालयाने भटक्या श्वानांच्या संदर्भात वेळोवेळी दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत जसे की, भटक्या श्वानांना पकडून निर्बीजीकरण, लसीकरण व जंतनिर्मुलन करणे, भटक्या श्वानांकरीता आश्रय / निवाऱ्यांची सोय करणे, भटक्या श्वानांना खाण्यासाठी जागा निश्चित करणे, हेल्पलाईन क्रमांक विकसित करणे, रुग्णालयांनी नेहमीच अँटी-रेबीज लस आणि Immunoglobulin चा अनिवार्य साठा ठेवणे इत्यादीबाबत राज्यातील सर्व महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायती यांना नगरविकास विभाग, शासन परिपत्रक दिनांक २४ नोव्हेंबर, २०२५ अन्वये सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, केंद्र शासनाचा प्राणी जन्म नियंत्रण (Animal Birth Control) नियम, २०२३ शासन निर्णय दिनांक २० मार्च, २०२५ अन्वये राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लागू करण्यात आला

आहे. त्यांनुसार सर्व महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायती येथे कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## थेरगाव येथे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून उभारण्यात येणाऱ्या रुग्णालयाचे कामकाज खाजगी संस्थांकडे सोपविण्यात येणार असल्याबाबत

**(३५) * ९३७९ श्री.अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड शहरातील कर्करोग रुग्णांसाठी वरदान असलेले १०० खाटांचे कर्करोग रुग्णालय थेरगाव येथे महानगरपालिकेच्या वतीने उभारण्यात येत असताना या रुग्णालयाचा कारभार खाजगी संस्थांकडे सोपविण्यात येणार असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेसाठी कर्करोग तज्ञ, ऑन्को सर्जन आणि ऑन्को फिजिशन ही दोन विशेष पदे शासनाने मंजूर केली असल्याने या रुग्णालयाचा कारभार खाजगी संस्थांकडे न देता शासनामार्फत चालविण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालयातील शुल्क हे महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेशी जोडले जाणार असल्याने गोरगरीब रुग्णांना येथे मोफत किंवा अत्यंत अल्प दरात सेवा मिळेल, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पिंपरी-चिंचवड शहरातील कर्करोग रुग्णांसाठी उभारण्यात येणाऱ्या रुग्णालयाचा कारभार खाजगी संस्थांकडे न सोपविता सदर रुग्णालय शासनामार्फत चालविण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) ऑन्को सर्जन आणि ऑन्को फिजिशन ही दोन विशेष पदे मंजूर आहेत ही बाब खरी आहे. सदर दोन पदांपैकी ऑन्को सर्जन हे पद भरण्यात आले आहे.

तथापि, प्रस्तावीत कर्करोग रुग्णालयामध्ये खालीलप्रमाणे सर्व प्रकारच्या अतिविशेष उपचार कर्करोग सुविधा पुरविण्यात येणार आहेत. त्यामध्ये Surgical Oncology, Medical Oncology & Haemato-Oncology, Radiation Oncology, Onco-Pathology, Pain and Palliative Care, Preventive Oncology, Psycho-oncology, Nuclear Medicine, Diagnostic and Interventional Radiology, Radiology, Pathology, Critical Care या सेवा तसेच Cancer Surgery Curative, palliative & Reconstructive, Radiation Therapy. Chemotherapy-High intensity chemotherapy, Bone man-ow transplant, Radiotherapy - ३D – CRT / IMRT I TGRT I Brachytherapy, Intra-Operative Radiotherapy, Cryo-surgery | Radio-frequency ablation therapies अशा निरनिराळ्या कर्करोग मधील निरनिराळ्या सुपर स्पेशालिटी सेवा पुरविण्यात येणार आहेत.

१०० बेडेड मल्टी स्पेशालिटी कर्करोग रुग्णालय सुरु करण्याकरीता साधारणतः निरनिराळ्या प्रकारच्या वर्ग १ ते वर्ग ४ पर्यंत अंदाजे ५०० डॉक्टर्स, इतर पॅरामेडिकल व इतर कर्मचाऱ्यांची आवश्यकता

असते. त्यामध्ये वरील सर्व सेवा पुरविण्याकरीता कर्करोगामधील निरनिराळे सुपर स्पेशालिटी अतिविशेष तज्ञांची आवश्यकता असते.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे निरनिराळया कर्करोगाच्या सेवांकरीता सुपर स्पेशालिटी तज्ञ डॉक्टर्स उपलब्ध होऊ शकत नाहीत.

(३) होय, हे खरे आहे.

(४) यापूर्वी पुणे महानगरपालिकेने पब्लिक प्रायव्हेट पाटर्नरशिप (पी.पी.पी.) तत्वावर कर्करोग रुग्णालय सुरु केलेले आहे. त्याच धर्तीवर नागरीकांना कर्करोगाच्या सर्व सुविधा एकाच छताखाली उपलब्ध होण्याकरीता

सदर रुग्णालय पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून बिल्ड, फायनान्स, ऑपरेट, ट्रान्सफर (DBFOT) पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (पी.पी.पी.) तत्वावर राबविण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई येथील अरुंद रस्त्यावरील भूखंड इमारती बांधण्यासाठी पात्र ठरविल्याबाबत

**(३६) * ८८३९ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये अग्निशमन दलाच्या गाड्या व रुग्णवाहिका सहज पोहचू शकतील या उद्देशाने किमान ९ मीटर रुंद असलेल्या रस्त्यांवरच उंच इमारतींना परवानगी होती परंतु आता हे निर्बंध शिथिल केले जाणार असून प्रस्तावित धोरणानुसार ९ मीटरपेक्षा कमी रुंदीच्या रस्त्यांवरील भूखंड देखील उंच इमारती विकासासाठी पात्र ठरविले असल्याची बाब माहे मार्च, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील जुन्या आणि असुरक्षित इमारतींच्या पुनर्विकासाला गती देण्याच्या उद्देशाने, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या (बीएमसी) नागरी संस्थेच्या सुधार समितीने विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (DCPR २०३४) मधील एका महत्वाच्या दुरुस्तीला मंजूरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्व प्रकल्पांनी बांधकाम सुरू करण्यापूर्वी अग्निसुरक्षेच्या नियमांचे पालन करणे आणि मंजुरी घेणे बंधनकारक असून, जुन्या वस्त्या, उपनगरे, गावठाणे क्षेत्रे आणि अरुंद अंतर्गत रस्ते असलेली ठिकाणे यांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दाटीवाटीच्या भागात उंच इमारती असल्यामुळे पायाभूत सुविधांवर ताण येवून, वाहतूक कोंडी वाढेल आणि आपत्कालीन परिस्थितीत मदतीसाठी निर्माण होणाऱ्या घटनेची वस्तुस्थिती विचारात घेवून शासनाने सदर दुरुस्ती मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशतः खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये महानगरपालिका रस्ता सार्वजनिक रस्त्यांची अंशतः लागून असलेल्या ३.६ मीटर पेक्षा जास्त पाईप ॲक्सेस (Pipe Access) / अरूंद प्रवेश असलेल्या निवासी भूखंडाच्या विकासासंदर्भात विनियम १९(२) मध्ये प्रस्तावना व तक्ता क्र.६ अ टिपणीसह समाविष्ट करणेकामी महापालिकेच्या विकास नियोजन विभागाने सुधार समिती व महापालिकेस सादर केलेल्या प्रस्तावाद्वारे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७ अंतर्गत विकास

नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मध्ये सुधारणा प्रस्तावीत केली आहे. तथापि, सदर प्रस्तावास सुधार समीती व महापालिकेची मंजुरी प्रलंबित आहे.

(२) हे खरे नाही.

वर (१) मध्ये नमूद केल्यानुसार महापालिकेच्या नियोजन विभागाने सादर केलेल्या प्रस्तावास सुधार समीती व महापालिकेची मंजुरी प्रलंबित आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेस सादर केलेल्या सर्व प्रकल्पांनी बांधकाम सुरू करण्यापूर्वी अग्निसुरक्षेच्या नियमांच्या अनुसरून संबंधित मुख्य अग्निशमन अधिकारी यांची मंजूरी घेणे आवश्यक आहे.

(४) वर (१) मध्ये नमूद केल्यानुसार महापालिकेच्या विकास नियोजन विभागाचे प्रस्तावास महापालिकेच्या सुधार समिती व महापालिकेची मंजुरी प्रलंबित आहे. सबब दुरुस्ती मागे घेण्याबाबत सद्य:स्थितीत कार्यवाही अभिप्रेत नाही.

(५) लागू नाही.

-----------------

## भडगाव (जि.जळगाव) येथील शासकीय हमीभाव केंद्रांवर नियोजनाअभावी शेतकऱ्यांची गैरसोय झाल्याबाबत

**(३७) * ९४५३ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भडगाव (जि.जळगाव) येथे शासकीय हमीभाव केंद्रावर (MSP) ज्वारी विक्रीसाठी ऑनलाईन धान्य नोंदणीची प्रक्रिया सुरू होती, परंतु त्यासाठी प्रत्यक्ष उपस्थित राहून टोकन घ्यावे लागत असल्याने मोठी गर्दी होऊन नियोजनाअभावी शेतकऱ्यांवर लाठीमार झाला असल्याची घटना दिनांक ८ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लाठीमारात तीन शेतकरी जखमी झाले असून भर उन्हात उभे राहिलेल्या शेतकऱ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची किंवा सावलीची कोणतीही सोय नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भडगाव शेतकरी संघाच्या नियोजनातील त्रुटींमुळे खरेदीचे टोकन मिळविण्यासाठी शेतकरी चोवीस तासांहून अधिक काळ रांगेत उभे होते या प्रकरणी दोषी आढळून आलेल्या संबधितांवर कोणती कारवाई केली तसेच धान्य नोंदणी प्रक्रिया नियोजनबध्दरित्या पार पाडण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) अंशत: खरे आहे.

भडगाव (जि.जळगाव) येथील शासकीय हमीभाव खरेदी केंद्रावर ऑनलाईन शेतकरी नोंदणीसाठी शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. तथापि, सदर खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांवर लाठीमार करण्यात आल्याची बाब घडलेली नाही.

(२) शासकीय धान्य खरेदी केंद्रावर ऑनलाईन शेतकरी नोंदणीसाठी झालेल्या गर्दी दरम्यान मंडपाचा पाईप कोसळून तीन शेतकरी जखमी झाले होते. त्यांना पोलीस प्रशासनाकडून तात्काळ शासकीय रुग्णालय, भडगाव येथे उपचारासाठी दाखल केले. संबंधित खरेदी केंद्रामार्फत शेतकऱ्यांसाठी निवारा, पिण्याचे पाणी

व इतर आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

(३) खरेदी केंद्रावर ऑनलाईन शेतकरी नोंदणीसाठी उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, व पोलीस निरीक्षक, भडगाव तसेच शेतकरी सहकारी संघ, भडगाव यांच्या संयुक्त बैठकीत झालेल्या निर्णयानुसार, शेतकरी सहकारी संघ, भडगाव या संस्थेच्या माध्यमातून ऑनलाईन शेतकरी नोंदणीसाठी स्वतंत्र लिंक तयार करण्यात आली. सदर लिंकची तालुक्यात व्यापक प्रसिध्दी करण्यात आल्याने शेतकऱ्यांनी त्यांच्या मोबाईलद्वारे घरबसल्या ऑनलाईन नोंदणी केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांच्या प्रवेशद्वारावर बनावट औषधांची विक्री होत असल्याबाबत

**(३८) * ९५७४ श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारित येणारी लोकमान्य टिळक,शताब्दी व केईएम रुग्णालय यासारख्या प्रमुख रुग्णालयांच्या प्रवेशद्वारावर बनावट औषधे वेदनाशामक तेल आणि गोळयांची अवैध विक्री सुरु असल्याची बाब माहे मार्च, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बनावट औषधांच्या वासानीही किंवा लावल्यामुळे रुग्णांना चक्कर येणे किंवा गरगरण्यासारखे त्रास होणे अशा तक्रारी वाढल्या असून अन्न व औषध प्रशासनाची कोणत्याही परवानगी नसतानाही औषधे रुग्णालया बाहेर असलेल्या सुरक्षारक्षकासमोरच विकली जात असून अशा अवैध औषध विक्रेत्यांवर आणि त्यांना मज्जाव न करणाऱ्या संबंधित सुरक्षा रक्षकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय आणि के.ई.एम. रुग्णालयाचे प्रवेशद्वारावर बनावट औषधे, वेदनाशामक तेल आणि गोळयांची अवैध विक्री सुरु असल्याची बाब निदर्शनास आली नाही.

उपनगरीय रुग्णालयातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कांदिवली रुग्णालयाच्या (शताब्दी रुग्णालय) आवारात आयुर्वेदिक औषधे विक्रीसाठी ठेवल्याचे आढळून आल्याने त्यांना सुरक्षा मदतनिसाद्वारे मज्जाव करण्यात आला. सद्य:स्थितीत या रुग्णालयांच्या आवारात किंवा प्रवेशद्वारावर कोणतीही व्यक्ती कसल्याही औषधांच्या विक्रीसाठी बसणार नाही, याबाबत सदर रुग्णालयाचे सुरक्षा मदतनीस यांच्याकडून दक्षता घेण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिडकोतील सहायक विकास अधिकारी यांच्या लाचखोरी प्रकरणाची चौकशी करण्याबाबत

**(३९) * ९३४९ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिडको प्रशासनांतर्गत कार्यरत असलेल्या सहायक विकास अधिकारी यांनी फ्लॅट हस्तांतरण प्रकरणात लाच मागितल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अधिकाऱ्याने संबंधित नागरिकाकडून फ्लॅट ट्रान्सफरसाठी मोठ्या रकमेची मागणी करून प्रत्यक्षात लाच स्वीकारल्याचे प्रकरण निदर्शनास आले असून या प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सदर प्रकरणी कोणती कारवाई केली आहे,
(३) असल्यास, सिडकोतील सहायक विकास अधिकाऱ्याविरुध्द फ्लॅट हस्तांतरणातील कथित लाचखोरी प्रकरणाची विभागीय चौकशी करुन संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) माहे जानेवारी, २०२६ मध्ये वसाहत विभाग नेरुळ येथे श्री.शैलेश आत्माराम घरत, सहायक विकास अधिकारी यांना लाचलुचपत विभागामार्फत दिनांक २८/०१/२०२६ रोजी रचलेल्या सापळ्यामध्ये अटक करण्यात आलेली होती. त्यानुषंगाने, श्री.शैलेश घरत यांचेविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने नेरुळ पोलीस ठाणे येथे दिनांक २९/०१/२०२६ रोजी गुन्हा क्र.६७/२०२६ दाखल केला आहे. श्री.शैलेश घरत, सहायक विकास अधिकारी यांना सिडको महामंडळाच्या सेवेतून दिनांक ३०/०१/२०२६ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आलेले असून त्यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) येथील आदिवासी विकास महामंडळांकडे ऑनलाईन नोंदणी केलेल्या ४ हजार शेतकऱ्यांच्या भात खरेदी प्रकरणाबाबत

**(४०) * ९७९२ श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची होणारी फसवणूक रोखण्याकरीता शासनामार्फत प्रतिवर्षी आधारभूत खरेदी केंद्रांच्या माध्यमातून योग्य हमीभाव देऊन भाताची खरेदी होत असून त्यापैकी सुमारे साडेतीन हजार शेतकऱ्यांनी आपला भात आदिवासी विकास महामंडळाला विक्री केला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी विकास महामंडळाने दिलेल्या आकडेवारीवरुन सुमारे ४ हजार शेतकऱ्यांचा नोंदणी केलेला हजारो टन भाताचा हिशोब लागत नसल्याची बाब दिनांक ६ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने शहापुरातील (जि.ठाणे) आदिवासी विकास महामंडळांकडे ऑनलाईन नोंदणी केलेल्या सुमारे ४ हजार शेतकऱ्यांच्या भात खरेदी प्रकरणाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, शेतकऱ्यांना कमी भावात धान्य विकावे लागू नये (Distress sale) म्हणून शासनातर्फे एफ.ए.क्यू (FAQ) दर्जाच्या धानाची खरेदी केली जात असून याव्यतिरिक्त, खाजगी व्यापाऱ्यांनी फसवणूक केल्यास महाराष्ट्र कृषी उत्पन्न बाजार समिती (APMC) कायद्यानुसार परवानाधारक व्यापाऱ्यांवर दंडात्मक कारवाईची व शिक्षेची तरतूदीची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) हे खरे आहे.

शहापूर तालूक्यात खरीप पणन हंगाम २०२५-२६ मध्ये आदिवासी विकास मंहामंडळामार्फत नोंदणीकृत ७,९५३ शेतकऱ्यांपैकी ३,४७४ शेतकऱ्यांकडून ६६,११३ क्विंटल धान खरेदी करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) चौकशीची बाब उद्‌भवत नाही.

(४) योजनेंतर्गत एफ.ए.क्यू (FAQ) दर्जाच्या धानाची खरेदी किमान आधारभूत किंमतीने खरेदी केली जाते. विभागाच्या दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार हमी भावापेक्षा कमी दराने खरेदी केली जाणार नाही यासाठी बाजार समितीला उचित कार्यवाही करण्यासाठी निर्देशित केले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड शहरातील सांडपाणी प्रकल्पासाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत

**(४१) * ९८०६ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमृत अभियानांतर्गत सन २०१७-१८ मध्ये बीड शहरातील सांडपाणी प्रकल्पाकरीता रुपये १४९.४७ कोटींच्या कामास मंजुरी देण्यात आली असून मुख्य अभियंता, नगरपरिषद, बीड, आणि कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्यात माहे नोव्हेंबर, २०१८ मध्ये करार करण्यात येऊन माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये कामास सुरुवात करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकल्पाच्या कामाकरीता बीड नगरपरिषदेमार्फत कंत्राटदारास आवश्यक जमीन उपलब्ध करून देण्यात आली नसल्यामुळे सदरहू कामकाज सुरू होऊ शकले नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामाकरीता बीड नगरपरिषदेने कंत्राटदारास दिनांक १८ जुलै, २०२२ पर्यंत मुदतवाढ दिल्यानंतरही जमीन उपलब्ध करून न दिल्यामुळे कंत्राटदाराने केलेल्या कामाचे १७.८० कोटी रुपये शासनाला द्यावे लागले, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकल्प केंद्र सरकार पुरस्कृत असल्यामुळे याबाबत भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (कॅग) यांनी त्यांच्या अहवालात हा खर्च निष्फळ ठरल्याचे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अमृत अभियानांतर्गत बीड शहरातील सांडपाणी प्रकल्पासाठी जागा उपलब्ध न झाल्यामुळे कोट्यवधी रुपयांचा अपव्यय झाला असून सदर प्रकरणी दोषी आढळून आलेल्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे अंशतः खरे आहे.

सदर प्रकल्पातील मलप्रक्रिया केंद्रासाठी प्रस्तावित केलेल्या जागेसंबंधी तांत्रिक अडचणी व स्थानिकांचा विरोध यामुळे जागा उपलब्ध झाली नाही. त्यामुळे एसटीपी व त्याच्याशी निगडीत कामे सुरू करता आली नाहीत. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर यांनी संबंधित प्रकल्प कंत्राटदारास जुलै, २०२२ पर्यंत भाववाढ फरकाशिवाय मुदतवाढ प्रदान केली.

तथापि, प्रस्तुत प्रकल्पातील संकलन व्यवस्थेचे ५९.८१ किमी तसेच, ट्रंकमेनचे ०.७८ किमी काम करण्यात आले असून झालेल्या कामाचे मोजमापानुसार अंतिम देयक रुपये १७.५९५ कोटी कंत्राटदारास अदा करण्यात आले असल्याचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने कळविले आहे.
(४) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वर्ष २०२५ अहवाल क्र. ८ मध्ये योजनेबाबत परिच्छेद समाविष्ट असून सदर परिच्छेदास अनुसरून झालेल्या खर्चाची कारणमिमांसा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने महालेखापाल कार्यालयास कळविली आहे ही वस्तुस्थिती आहे.
(५) व (६) केंद्र पुरस्कृत अमृत अभियानंतर्गत मंजूर बीड शहर मलनिःस्सारण प्रकल्पातील संकलन व्यवस्थेची झालेली कामे प्रकल्पासाठी आवश्यक जागा प्राप्त झाल्यानंतर या योजनेंतर्गत झालेली संकलन व्यवस्था उपयोगात आणणे शक्य आहे व तसे नियोजन असल्याचे व या योजनेंतर्गत झालेल्या कामात शासन निधीचा अपव्यय झाला नसल्याचे मुख्याधिकारी, बीड नगरपरिषद व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने कळविले आहे.

-----------------

## मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समितीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४२)** * **१०४१४ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समितीमध्ये अंदाजे रुपये ५४ कोटींचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याची तसेच स्थानिक निधी लेखापरीक्षण विभागाच्या सन २०१७-१८ ते २०२४-२५ च्या अहवालांमध्ये आर्थिक व प्रशासकीय अनियमितता झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बाजार समितीतील लेखा विभागाकडून आर्थिक व्यवहार, कंत्राट प्रक्रिया, ई-निविदा, मालमत्ता नोंदी, वाहन खरेदी, जाहिरात कंत्राटे तसेच भूखंड वापराबाबत नियमबाह्य कार्यवाही झाल्याने बाजार समितीचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाल्याचे लेखापरीक्षण अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित अधिकारी, कर्मचारी, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी व तत्कालीन समिती यांच्या भूमिकेची चौकशी करण्याबाबत तसेच दोषींवर फौजदारी/विभागीय कारवाई

करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, बाजार समितीतील आर्थिक गैरव्यवहार, प्रलंबित लेखापरीक्षण परिच्छेद व महसूल हानी रोखण्यासाठी शासनाने कोणती सुधारात्मक उपाययोजना व नियंत्रण यंत्रणा लागू केली आहे वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) लेखापरीक्षण अहवालात आक्षेप नोंदविण्यात आले आहेत.लेखापरिक्षण अहवालातील आक्षेपांची अंशत: पूर्तता करण्यात आली असून उर्वरीत आक्षेपांची पूर्तता करणेचे व्यापार समिती स्तरावर काम सुरू आहे.

(३), (४) व (५) बाजार समितीतील अंदाजे रुपये ५४ कोटी रूपयांच्या आर्थिक गैरव्यवहाराच्या अनुषंगाने तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेमार्फत कळंबोली पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर क्र. २०६ / २०२४ दिनांक १०/०६/२०२४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून या प्रकरणी १५ जणांना अटक करण्यात आली. त्यापैकी ८ जण अटकेत असून ७ जणांना जामीनावर सोडण्यात आले आहे.गुन्हा रजि.नं. २०६/२०२४ दिनांक १०/०६/२०२४ भा.दं.वि.सं. कलम ४२०,४६५, ४६७, ४६८,४७१,१२० ब या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आर्थिक गैरव्यवहाराच्या अनुषंगाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून चौकशी करण्यात आली. त्यांच्याकडून अहवाल शासनास सादर करण्यात आला होता.या प्रकरणी शासनाच्या सूचनेनुसार सर्व संबंधित पदाधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून खुलासा घेणेबाबत प्राधिकरणाने बाजार समितीस सूचीत केले. त्यानुसार संबंधित पदाधिकारी / अधिकारी /कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा घेण्याची कारवाई करण्यात येत आहे.

तसेच, वित्त विभागाच्या शासन निर्णय दिनांक २७/१०/२०१५ नुसार सन २०२४ पासून नियमीतपणे मुदत ठेवींची पडताळणी करणेची दक्षता घेण्यात येत आहे.

-----------------

## विरार - अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्गिका प्रकल्पासाठी टोल वसुलीच्या निर्णयाबाबत

**(४३)** * **१०५०३ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बहुचर्चित विरार-अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्गिका प्रकल्प ‘बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा’ (बीओटी) या तत्त्वावर बांधून पूर्ण झाल्यानंतर संबंधित कंत्राटदार कंपनीला ४० वर्षे टोलवसुली करता येणार असून सदर मार्गावर कार, जीप अशा चारचाकी वाहनांसाठी रुपये ७६५ एवढ्या रक्कमेचा टोल आकारला जाणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून (एमएसआरडीसी) विरार ते अलिबाग यादरम्यान १२८ किलोमीटर लांबीच्या बहुउद्देशीय वाहतूक मार्गासाठी सध्या भूसंपादनाचे काम सुरू असून मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच पार पडलेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीने या प्रकल्पाच्या ९७ किलोमीटर लांबीच्या फक्त रस्तेबांधणी कामासाठी लागणाऱ्या ३१ हजार ७९३ कोटी रुपये खर्चाला प्रशासकीय मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विरार-अलिबाग मार्गासाठी टोल आकारणाऱ्या कंपनीवर मार्गाच्या देखभाल- दुरुस्तीची जबाबदारी असून टोलवसुलीचा कालावधी ४० वर्षे असला तरी त्याचा आढावा शासकीय समितीकडून घेतला जाणार असून टोल आकारणीतून मिळणारी रक्कम पहाता टोलचा ४० वर्षांचा कालावधी कमी करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रकल्पासाठी निवडलेल्या कंत्राटदाराची निवड प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडण्यात आली होती काय तसेच प्रकल्पासाठी पर्यावरणीय मंजुरी (environment clearance) व स्थानिक नागरिकांच्या हरकती विचारात घेण्यात आल्या आहेत काय, प्रकल्पामुळे प्रभावित होणाऱ्या गावांतील नागरिकांचे पुनर्वसन व भरपाईबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(५) असल्यास, टोल वसुलीत पारदर्शकता राखण्यासाठी डिजिटल प्रणालीची (FASTag, audit mechanism) प्रभावीपणे अंमलबजावणी करुन सदर प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही तसेच प्रकल्प पूर्ण होण्याची कालमर्यादा काय आहे आणि सदर प्रकरणी दोषी आढळून आलेल्या कंत्राटदारावर कोणती दंडात्मक कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

प्रकल्पाचा सवलत कालावधी ४० वर्ष इतका निर्धारित करण्यात आला आहे.

(४) सदर कामाची निविदा प्रक्रिया अद्याप सुरु झालेली नाही.

सदर प्रकल्पास केंद्रिय पर्यावरण मंत्रालयाच्या Expert Appraisal Committee (EAC) कडून पर्यावरण दाखला व CRZ मंजुरी दिनांक १५/०४/२०२६ रोजी प्राप्त झालेली आहे. स्थानिक नागरीकांच्या हरकती वेळोवेळी विचारात घेण्यात आल्या असून त्या-त्या वेळी त्यांचे निराकरण करण्यात आले आहे. प्रकल्पामुळे प्रभावित होणाऱ्या गावातील नागरीकांच्या पुर्नवसन व भरपाईबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा दर निश्चिती समीती स्थापन करुन नुकसान भरपाईचे दर निश्चित केले आहेत.

(५) प्रकल्प पूर्णपणे कार्यान्वयीत झाले नंतर टोल वसुली पारदर्शक राखण्यासाठी FasTag, Audit Mechanism चा प्रभावी पणे वापर करण्यात येईल. सदर प्रकल्प तातडीने पूर्ण करण्यासाठी भुसंपादनाची प्रक्रिया जलद गतीने सुरु असून एकूण भुसंपादनाच्या ३७% इतके भुसंपादन आजमितीस झाले असून त्यासाठी रुपये ६६२७.६१ कोटी इतक्या मोबदल्याचे वाटप भूधारकांना करण्यात आले आहे. सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कंत्राटदरास कार्यारंभ आदेश पारित झाल्यानंतर ३ वर्ष इतका कालावधी निर्धारीत करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रेवस ते कारंजा (ता.उरण, जि.रायगड) या सागरी पुलासाठी भूसंपादन केले नसल्याबाबत

**(४४) * १०५४९ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या कोणत्याही माध्यमातून प्रस्तावित असलेल्या रेवस ते कारंजा (ता.उरण, जि.रायगड) या महत्वाकांक्षी सागरी पुलासाठी कुठल्याही शेतकऱ्याची जमीन संपादित न करताच सदर पुलाच्या कामकाजाला गत दोन वर्षापासून सुरुवात केली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, द्रोणागिरी पर्वताचे संरक्षण आणि स्थानिकांचा विरोध प्रगतीपथावर असतानाच करंजा येथील चाणजे महसूल हद्दीतील जमीन संपादनाला स्थानिकानी विरोध दर्शविला असून डोंगर उत्खननामुळे पर्यावरणाला धोका निर्माण होऊ शकतो अशी भिती व्यक्त करुन या मार्गाचा पुर्नविचार करुन शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रेवस ते कारंजा या सागरी महामार्ग पुलामुळे करंजा येथील ४०० स्थानिक नागरिक बाधित झाले होणे, पुलाच्या कामाला सुरुवात होऊन दोन वर्षाचा कालावधी होऊनही बाधित मच्छिमार व शेतकरी वर्गाला शासनाकडून अद्यापही नुकसान भरपाई मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रेवस-कारंजा पूल अलिबाग आणि मुरूडसह कोकणाकडे जाणाऱ्या पर्यटकांना खूप महत्त्वाचा ठरणार असून या पुलामुळे अलिबाग थेट नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासह जेएनपीटीला जोडले जाणार आहे. कोकणातील बहुतांशी पर्यटन केंद्रे, समुद्रकिनारे व किल्ले किनारपट्टीवर असल्याने पर्यटन विकासाला गती आंबा उत्पादन व मत्स्यव्यवसायाला अधिक गती मिळेल, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शेतकऱ्यांच्या खाजगी जागेत शेतकऱ्यांच्या जमिनीची टेस्टींग पाईलिंग सुरु असून त्याकरीता शेतकऱ्यांची कोणतीही परवानगी घेण्यात आली नसून ६० एकर क्षेत्र बाधित होत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, रेवस-कारंजा पुलामुळे बाधित झालेल्या शेतकरी व मच्छीमारांनी केलेल्या मागणीन्वये दिनांक ९ मार्च, २०२३ च्या शासन निर्णयानुसार नुकसान भरपाई देणे, शेतकऱ्यांवर दाखल केलेले गुन्हे मागे घेणे, या व अन्य मागण्या केल्या आहेत त्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(७) असल्यास, रायगड जिल्ह्यातील रेवस ते कारंजा या महत्त्वाकांक्षी सागरी पुलाच्या निविदा प्रक्रियेत आणि बांधकामात कंत्राटदाराने केलेले काम, त्यातील अनियमितता किंवा विलंबाबाबत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून (MSRDC) दंडात्मक कारवाई वा काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करण्यात आली आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

रेवस कारंजा खाडीपुलाच्या बांधकामासाठी दिनांक ०५/११/२०२४ रोजी कंत्राटदाराची नेमणूक केली आहे. सद्य:स्थितीत धरमतर खाडीमध्ये व सिडकोच्या जागेमध्ये खाडी पुलाचे काम करण्यात येत आहे. सद्य:स्थितीत पुलाच्या कामासाठी भूसंपादीत करावयाच्या खाजगी जागेमध्ये भूसंपादनाच्या अनुषंगाने कार्यवाही प्रगतीत असल्याने खाजगी जागेमध्ये काम सुरु केलेले नाही.
(२) अंशत: खरे आहे.

रेवस रेडी सागरी महामार्गावरील रेवस कारंजा पुलासाठी मौजे चाणजे, ता.उरण येथील खाजगी जमीन संपादन करण्यासाठी महाराष्ट्र महामार्ग अधिनियम १९५५ च्या कलम १८ (१) नुसार अधिसूचना दिनांक १२/०३/२०२५ रोजी प्रसिध्द केली असून संपादीत केलेल्या जमीनीचा अंतिम निवाडा घोषित

करण्याबाबतची कार्यवाही सद्य:स्थितीत प्रगतीपथावर आहे. भूसंपादनासाठी बाधित शेतकऱ्यांना मोबदला अदा करण्यासाठी रुपये ८४.९१ कोटी इतकी रक्कम संबंधित सक्षम अधिकाऱ्यांकडे वर्ग केलेली आहे. सदर पुलाची आखणी डोंगराचे कमीत कमी उत्खनन करुन पर्यावरणाला कुठलाही धोका निर्माण होणार नाही अशा प्रकारे आखण्यात आलेली आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) हे खरे आहे.

(५) हे खरे नाही.

रेवस रेडी सागरी महामार्गावरील रेवस कारंजा पुलांच्या बांधकामासाठी सद्य:स्थितीत खाजगी क्षेत्राच्या भूसंपादनाच्या अनुषंगाने कार्यवाही प्रगतीत असल्याने सदर जागेमध्ये काम सुरु केलेले नाही. दिनांक १२/०३/२०२५ रोजी प्रसिध्द केलेल्या कलम १८ (१) च्या अधिसुचनेनुसार रेवस-कारंजा पुलासाठी ११.३८ हे.आर इतके खाजगी क्षेत्र बाधित होत आहे.

(६) कृषी व पदुम विभागाच्या दिनांक ०९/०३/२०२३ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील बांधकाम प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या मच्छिमारांना नुकसान भरपाई अदा करण्यासाठीचे धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. सदर धोरणाच्या अनुषंगाने महामंडळाने रेवस कारंजा पुलासाठी बाधित होणाऱ्या मच्छिमांराचे होणारे आर्थिक नुकसान भरुन काढण्यासाठी व त्यांना द्यावयाचे नुकसान भरपाई याबाबत बेस लाईन सर्वेक्षण व इत्यादी अभ्यास करुन त्याबाबतचा अहवाल तयार करण्यासाठी महामंडळाने केंद्रीय समुद्री मत्स्यकी अनुसंधान संस्थान (CMFRI) यांची नियुक्ती केली आहे. सदर संस्थेमार्फत सर्वेक्षणाचे काम प्रगतीपथावर आहे. CMFRI यांनी दिनांक ०९/०६/२०२६ रोजी प्राथमिक अहवाल सादर केलेला असून बाधित मच्छिमारांची यादी निश्चित करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. सदर यादी मत्स्य विभागाकडून प्रमाणित केल्यानंतर बाधित मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

महामंडळातर्फे कुठल्याही शेतकऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील उच्च कॅफिनयुक्त एनर्जी ड्रिंक्सच्या विक्रीवर बंदी घालण्याबाबत

**(४५) * ९०६८ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अल्पवयीन मुलांमध्ये एनर्जी ड्रिंक्स (ऊर्जा पेये) सेवनाचे प्रमाण अत्यंत चिंताजनक असून या पेयांमधील उच्च कॅफिन आणि साखरेचे प्रमाण मुलांच्या आरोग्यासाठी गंभीर धोके निर्माण करत असून आरोग्यतज्ज्ञ आणि प्रशासनासाठी चिंतेचा विषय बनली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कॅफिनमुळे मुलांमध्ये आरोग्यविषयक समस्या उद्भवत असून एनर्जी ड्रींक्सची किराणा मालाच्या दुकानात मोठ्या प्रमाणात विक्री केली जाते परंतु, हे एनर्जी ड्रींक्स १८ वर्षाखालील मुलांनी सेवन करु नये असे लिहिण्यात आलेले असतानाही विक्रेते याकडे दुर्लक्ष करुन सरसकट वयातील मुलांना एनर्जी ड्रींक्सची विक्री करतात तसेच अनेक पालकांमध्ये देखील याबाबतीत जागरुकता नसल्याने सदर पेयांचे विक्रीचे प्रमाण अधिक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अन्न व औषध प्रशासनाने (FDA) शाळा आणि महाविद्यालयांच्या ५०० मीटर परिसरात उच्च कॅफिनयुक्त एनर्जी ड्रिंक्सच्या विक्रीवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला असून ही बंदी प्रभावीपणे लागू करण्यासाठी शाळांच्या आसपासच्या दुकानांची तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शाळा व महाविद्यालय परिसरात अशा पेयांच्या विक्रीवर निर्बंध घालण्याबाबत ऊर्जा पेयांच्या विक्रीवर नियंत्रण ठेवण्यासाठी त्याबाबत जनजागृती करण्यासाठी तसेच नियम मोडून विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत कडक कारवाई आणि दंड आकारण्याची तरतूद करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) अंशत: खरे आहे.

अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ तसेच याअंतर्गत नियम व नियमने यामध्ये ‘एनर्जी ड्रिंक्स’ यांची व्याख्या दिलेली नाही. परंतु, अन्न सुरक्षा व मानके (फूड प्रॉडक्ट्स अ‍ॅन्ड फूड अ‍ॅडीटिव्हज), २०११ चे नियमन २/१०/६ अन्वये कार्बोनेटेड वॉटर, कॅफिनेटेड बेव्हरेजेस (कार्बोनेटेड, नॉन कार्बोनेटेड), नॉन कार्बोनेटेड वॉटर बेस्ड (नॉन-अल्कोहोलीक) साठी मानके निश्चित करण्यात आली असून त्यात ‘कॅफिन’ या घटक पदार्थाचे प्रमाण मर्यादीत करण्यात आले आहे.
(२) एनर्जी ड्रिंक्सची विक्री किरकोळ विक्रेते, घाऊक विक्रेते, वितरक हे सर्वजण अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत विहित परवाना/नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करू शकतात. किराणा दुकानांमध्ये एनर्जी ड्रिंक्सची विक्री करू नये, अशी कोणतीही तरतूद अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ व त्या अंतर्गत नियम, नियमने यामध्ये करण्यात आली नाही. तथापि, Food Safety and Standards (Food Products Standards and Food Additives) Regulation, २०११ चे नियमन २.१०/०६/२ (V)(b) मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे.

Prominent display of caution “Not recommended for children, pregnant or lactating women, persons sensitive to caffeine. परंतु, Caffeinated Beverages ची विक्री १८ वर्षाखालील मुलांना करू नये, असे नमूद नाही.
(३) व (४) हे खरे नाही.

शाळा आणि महाविद्यालयांच्या ५०० मीटर परिसरात उच्च कॅफिनयुक्त एनर्जी ड्रिंक्सच्या विक्रीवर बंदी घालण्याबाबत कोणतेही आदेश अन्न व औषध प्रशासनाकडून निर्गमित केले नाहीत. तथापि, दिनांक ०३/१०/२०२४ व दिनांक १७/०१/२०२५ रोजीच्या परिपत्रकान्वये शैक्षणिक संस्थेपासून किमान ५०० मीटरच्या परिसरात Beverages Non Alchoholic (Energy Drinks) या अन्न पदार्थाची विक्री करणाऱ्या आस्थापनांवर व Beverages Non Alchoholic (Energy Drinks) या अन्नपदार्थाच्या आस्थापनांची तपासणी करून अन्ननमुने विश्लेषणासाठी घेणे व आक्षेपार्ह जाहिरातींविरुध्द कारवाई करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

राज्यात माहे एप्रिल, २०२५ ते माहे मार्च, २०२६ या कालावधीत एनर्जी ड्रिंक्स या अन्न पदार्थाचे एकूण ११५ अन्न नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले असून ६३ अन्न नमुने प्रमाणित, १ नमुना कमी दर्जा, ६ अन्ननमुने मिथ्याछाप घोषित केले असून ४५ अन्ननमुन्याचे अहवाल प्रलंबित आहेत. कमी दर्जा व

मिथ्याछाप अन्ननमुने प्रकरणी २ न्यायनिर्णय अर्ज व ३ तडजोड अर्ज (compounding) दाखल केलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कंधार (जि.नांदेड) तहसील कार्यालयात अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब योजनेंतर्गतचे अर्ज प्रलंबित असल्याबाबत

**(४६) * ९२०७ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वाढत्या उष्णतेमुळे शासनाने अंत्योदय व प्राधान्य कुटुंब योजनेतील शिधापत्रिकाधारकांना माहे एप्रिल ते जून या कालावधीतील तीन महिन्यांचे धान्य एकत्र देण्याचा निर्णय घेतला असल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किनवट तालुक्यात (जि.नांदेड) सदर योजनेची अंमलबाजवणी अद्याप अपेक्षित गतीने सुरु झालेली नसून ई-पॉश मशीनमध्ये तीन महिन्यांच्या धान्य वितरणाची नोंद झालेली असतानाही प्रत्यक्षात केवळ एक महिन्याचा साठा उपलब्ध असल्यामुळे लाभार्थ्यांना धान्य पुरवठा करण्यास अडथळा निर्माण झालेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कंधार तहसिल कार्यालयात (जि.नांदेड) अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब योजनेंतर्गत स्वस्त धान्य मिळविण्यासाठी दाखल करण्यात आलेले सुमारे १६०० अर्ज प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे गत अनेक महिन्यांपासून प्रलंबित असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मजुरी करून पोट भरणाऱ्या डोंगराळ भागातील लाभार्थ्यांचे अर्ज दाखल करूनही ते मंजुरीच्या प्रतीक्षेत प्रलंबित असल्यामुळे तालुक्यातील अनेक गोरगरीब, दिव्यांग व विधवा लाभार्थी स्वस्त धान्याच्या सुविधांपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, किनवट तालुक्यासह (जि.नांदेड) राज्यातील अन्य जिल्ह्यातील लाभार्थ्यांना उक्त योजनेंतर्गत तीन महिन्याचे धान्य एकत्र वितरीत करण्यासाठी आवश्यक असलेला धान्य पुरवठा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(६) असल्यास, सदर प्रकरणी दखल घेऊन उक्त योजनेंतर्गत प्रलंबित असलेले अर्ज त्वरीत निकाली काढण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) केंद्र शासनाने दिनांक ०२/०३/२०२६ रोजीच्या पत्रान्वये, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत माहे एप्रिल ते जून, २०२६ या कालावधीतील अन्नधान्याची आगाऊ उचल करुन त्याचे वितरण करण्याबाबतचे निर्देश दिले आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) कंधार तालुक्यात अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब योजनेंतर्गत स्वस्त धान्य मिळण्यासाठी तसेच एपीएल शेतकरी योजनेतील लाथार्थ्यांनी पैसे ऐवजी धान्य मिळणेबाबत माहे

एप्रिल-२०२६ अखेरपर्यंत एकूण ३६८ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी १८७ अर्ज निकाली काढण्यात आले असून, उर्वरित १८१ अर्जांचे ऑनलाईन डेटाएन्ट्री करून अर्ज निकाली काढण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) तीन महिन्याचे धान्य आगाऊ उचल करून वाटप करण्याकरीता आवश्यक सुचना देण्यात आल्या आहेत. याबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात आला आहे. क्षेत्रिय स्तरावरील सर्व संबंधित अधिकाऱ्यांसोबत योग्य तो समन्वय साधण्यात आला आहे.

(६) विभागाच्या दिनांक ०२/०६/२०२६ रोजीच्या शासन निर्णयास अनुसरून मा.जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या दिनांक १७/०६/२०२६ रोजीच्या आदेशान्वये कंधार तालुक्यास वाढीव इष्टांक मंजूर केला आहे. त्यानुषंगाने राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## राज्यात विशेषत: पुणे जिल्ह्यात रासायनिक भेसळयुक्त गुळाची विक्री करुन ग्राहकांची फसवणूक करण्यात येत असल्याबाबत

**(४७)** * **८८५३ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: पुणे जिल्ह्यातील गुऱ्हाळात तयार होणाऱ्या गुळाला आकर्षक पिवळाधमक रंग येण्यासाठी मानवी आरोग्यास घातक रसायनांचा राजरोसपणे वापर केला जात असून बाजारात मोठ्या प्रमाणात मागणी असलेल्या साध्या, भेसळयुक्त गुळावर 'सेंद्रिय' असा शिक्का मारून तो चढ्या दराने विकत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास काही ठिकाणी जुनी, खराब झालेली साखर तसेच रिजेक्ट झालेले चॉकलेट्स वितळवून गुळामध्ये मिसळले जात असून गुऱ्हाळांवर अशा पदार्थांचे ढीगही आढळून येत आहेत, तसेच स्थानिक बाजारपेठेत मिळणाऱ्या गुळामध्ये मोठ्या प्रमाणावर रासायनिक भेसळ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भेसळीचा नागरिकांच्या आरोग्यावर होणारा परिणाम पहाता उपरोक्त प्रकरणी दखल घेऊन जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकरीता विभागाने अन्न व औषध भेसळ प्रतिबंधक कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशतः खरे आहे.

अन्न व औषध प्रशासनामार्फत पुणे जिल्ह्यात माहे मे, २०२६ ते दिनांक ११ जून २०२६ या कालावधीत गुळ निर्मिती करणाऱ्या ०६ गुऱ्हाळ घरांवर धाडी टाकण्यात आल्या. सदर कारवाईदरम्यान गुळ उत्पादन प्रक्रियेत साखरेची भेसळ केली जात असल्याचे निदर्शनास आले. तसेच गुळ निर्मिती प्रक्रियेत मिसळण्यासाठी साखर हा भेसळकारी पदार्थ साठवून ठेवलेला आढळून आला. या प्रकरणी गुळाचे ०८ व भेसळकारी पदार्थ साखरेचे ०४ असे एकूण १२ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले आहेत. तसेच गुळाचा २०.७७ टन व भेसळीसाठी वापरण्यात येणाऱ्या साखरेचा एकूण २० टन असा रुपये १९,९६,३३८/-

किंमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे. सदर नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्रलंबित आहेत. विश्लेषण अहवाल प्राप्त झाल्यानंतर अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ तसेच त्याअंतर्गत नियम व विनियमांतील तरतुदीनुसार संबंधितांविरुध्द पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

(३) अन्न व औषध प्रशासनामार्फत नियमीतपणे अन्न आस्थापनांची तपासणी करून अन्न नमुने विश्लेषणासाठी घेण्यात येतात. कमी दर्जा व मिथ्याछाप नमुना प्रकरणी परवानापात्र आस्थापनांविरुध्द न्यायनिर्णय प्रकरणे दाखल केली जातात व नोंदणीपात्र आस्थापनांविरुध्द तडजोड प्रकरणे दाखल केली जातात तसेच असुरक्षित नमुने प्रकरणी मा.न्यायालयात खटले दाखल करण्यात येतात.

प्रशासनामार्फत राज्यात ०१ एप्रिल, २०२६ ते ११ जून, २०२६ या कालावधीत गुळाचे एकूण २७ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले आहेत. त्यापैकी ६ नमुन्यांचे अहवाल प्राप्त झाले असून, ५ नमुने प्रमाणित दर्जाचे घोषित करण्यात आले आहेत. १ नमुना असुरक्षित घोषित करण्यात आला आहे. २१ नमुन्यांचे अहवाल प्रलंबित आहेत. प्राप्त नमुन्यांच्या अहवालापैकी असुरक्षित अन्न नमुना प्रकरणी मा.न्यायालयात खटला दाखल करण्याचे प्रस्तावित आहे तसेच, अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी अन्न व औषध प्रशासनामार्फत राज्यभर विशेष तपासणी मोहिमा, धाड कारवाई, अन्न नमुना संकलन, जनजागृती कार्यक्रम, अन्न व्यवसायिकांना प्रशिक्षण तसेच कायद्याच्या तरतुदींच्या प्रभावी अंमलबजावणीद्वारे नियमित देखरेख व नियंत्रणाची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील रब्बी हंगामातील धान खरेदीसाठी आदिवासी विकास महामंडळाची खरेदी केंद्रे सुरु झाली नसल्याबाबत

**(४८) * ९८४० श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०२५-२६ च्या खरीप हंगामात राज्यात एकूण १५,१८,८१८ हेक्टरवर धानाची पेरणी करण्यात आली असून किमान ३६ लाख टन धानाचे उत्पादन होणार असा अंदाज कृषी संचालनालयाने व्यक्त केला असल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रब्बी हंगामातील धान खरेदीसाठी आदिवासी विकास महामंडळाची खरेदी केंद्रे अद्याप सुरु न झाल्याने परिसरातील हजारो शेतकरी अडचणीत सापडले असून मागील हंगामातील गोदामातील धानाचा साठा अद्याप उचलण्यात न आल्यामुळे नवीन धान खरेदीसाठी जागेचा प्रश्न निर्माण झाला असून खरेदी प्रक्रिया सुरु झाली नसल्याने त्याचा फटका थेट शेतकऱ्यांना बसत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाढता उत्पादन खर्च, नैसर्गिक आपत्ती, बाजारातील अनिश्चितता याचा सामना शेतकऱ्यांना करावा लागत असून तात्काळ खरेदी केंद्रे सुरु करुन गोदामातील साठा उचलण्याबाबत तसेच धान साठवणूकीची गंभीर समस्या निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(४) असल्यास, मार्केटींग फेडरेशन व आदिवासी विकास महामंडळाने राज्यातील ३,५०,३९३ नोंदणीकृत शेतकऱ्यांकडून एकूण १/०३/८०२ टन धान खरेदी केले असूनही खरेदी एकूण उत्पादनाच्या २.८८ टक्के तर उद्दिष्टाच्या एकूण ५.६१ टक्के एवढी आहे. यानुसार तसेच २,८४,४४४ नोंदणीकृत शेतकरी एम.एस.पी.

खरेदीपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, धान खरेदी न केलेल्या शेतकऱ्यांनाकडून एम.एस.पी नुसार शासनाने धान खरेदी करुन विशेष आर्थिक पॅकेज देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) हे अंशत: खरे आहे.

खरीप पणन हंगाम २०२५-२६ मध्ये राज्यात धान पिकाची १५.१८ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झालेली असून २९.४३ लाख टन धान उत्पादनाचा अंदाज कृषी संचालनालयाने व्यक्त केला होता.
(२) रब्बी पणन हंगाम २०२५-२६ अंतर्गत किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत धान खरेदी दिनांक ०१ मे, २०२६ पासून सुरु करण्यात आली असून, सदर खरेदीची अंतिम मूदत दिनांक ३० जून, २०२६ रोजी पर्यंत आहे.

खरीप पणन हंगाम २०२५-२६ अंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या धानाच्या भरडाईची कार्यवाही सुरळीतपणे सुरु आहे.
(३) किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत केंद्र शासनाने निर्धारित केलेल्या हमीभावाप्रमाणे राज्य शासनाकडून धानाची खरेदी करण्यात येत आहे.
(४) हे अंशत: खरे आहे.

खरीप पणन हंगाम २०२५-२६ मध्ये धान विक्रीसाठी नोंदणी केलेल्या ७,१६,३२२ शेतकऱ्यांपैकी ३,५०,३९१ शेतकऱ्यांकडून १०.३८ लाख मेट्रिक टन धानाची खरेदी करण्यात आली आहे. केंद्र शासनाने मंजूर केलेल्या उद्दिष्टाच्या ९९.३३ टक्के धान खरेदी करण्यात आले आहे.
(५) किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत केंद्र शासनाने निर्धारित केलेल्या हमीभावाप्रमाणे राज्य शासनाकडून धानाची खरेदी करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई-नाशिक महामार्गावरील माजिवाडा ते वडपे मार्गिकेचे काम पूर्ण करण्याबाबत

**(४९)** * **९९२९ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खारेगाव (जि.ठाणे) येथे मुंबई-नाशिक महामार्गावर नऊ वर्षांनंतर पुन्हा टोलनाका सुरू करण्यात येणार असून यामुळे मुंबईकडे जाणारा प्रवास वेगवान होणार असला तरी ठाणे, कल्याण, भिवंडी, नवी मुंबई आणि मुंबईकडे येणाऱ्या वाहनचालकांना पुन्हा टोलचा आर्थिक भार सहन करावा लागणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माजिवाडा ते वडपे या प्रकल्पाचे काम अद्याप १० टक्के शिल्लक असतानाही टोलनाका उभारणीचे काम सुरू करण्यात आले असून, यामुळे समृद्धी महामार्ग, उरण जेएनपीटी व गुजरातकडून येणाऱ्या वाहनचालकांवर आर्थिक भुर्दंड पडणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१७ मध्ये बंद झालेली टोल वसुली पुन्हा सुरू केल्याने प्रवाशांमध्ये नाराजी निर्माण झाली असून ठाणे खाडी किनारा मार्ग (कोस्टल रोड) या महामार्गाला जोडला गेल्यानंतर तेथील वाहनांनाही या टोलचा भार सहन करावा लागणार आहे तसेच समृद्धी महामार्गावर जोडण्यासाठी आमने ते ठाणे असा दहा पदरी रस्ता तयार करण्यात आल्याने पुन्हा एकदा खारेगाव इथे टोलनाक्याची उभारणी सुरू करण्यात

आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने महामार्गाचे काम पूर्ण झाल्याशिवाय टोल वसुली सुरू करू नये याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे, तसेच स्थानिक वाहनधारकांना या टोलमधून कायमस्वरूपी सवलत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयामार्फत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून ठाणे ते नाशिक रा.म. क्र. ८४८ वरील ठाणे ते वडपे या लांबीतील रुंदीकरणाचे काम हाती घेण्यात आलेले आहे. याअंतर्गत अस्तित्वातील चार पदरी डांबरी रस्ता दोन्ही बाजूच्या सर्व्हिस रोडसह आठ पदरी सिमेंट काँक्रीट रस्त्यामध्ये रुपांतरीत केला जात आहे. सदर प्रकल्प हायब्रीड ॲन्युइटी मॉडेल (HAM) तत्वावर राबविण्यात येत असून सदर प्रकल्पासाठी मेसर्स एमएसआरडीसी इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट लि. (M/S MSRDC Infrastructure Project Ltd) हे सवलतकार (Concessionaire) आहेत.

खारेगाव टोलनाक्याचे बांधकाम हे या प्रकल्पाचा एक भाग आहे. सदर प्रस्तावित टोल हा ठाणे-नाशिक रा.म.क्र.८४८ वरील वडपे ते ठाणे या टप्प्यासाठी आहे.

सद्य:स्थितीत ठाणे ते वडपे या भागातील ९२ % काम झाले असून उर्वरीत काम प्रगतीत आहे. काम पूर्ण झाल्यानंतर टोल वसुली सुरु करण्याचे नियोजन आहे.
(४) राष्ट्रीय महामार्ग शुल्क (दर निश्चिती आणि वसुली) नियम, २००८ च्या तरतुदीनुसार व संबंधित सवलत करारामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींनुसार राष्ट्रीय महामार्गांवर टोल वसुली केली जाते. याव्यतिरीक्त राष्ट्रीय महामार्गाच्या स्थानिक व नियमित वापरकर्त्यांसाठी टोलमध्ये विविध सवलती व मासिक पासच्या सवलती उपलब्ध आहेत.

ठाणे ते वडपे या भागातील काम पूर्ण झाल्यानंतर टोल वसुली सुरु करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील निवासी इमारतींवर अनधिकृतरित्या मोबाईल टॉवर्स उभारण्यात आल्याबाबत

**(५०) * ९१५४ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील अनेक निवासी इमारतींवर क्षमता न तपासता अनधिकृतरीत्या मोबाईल टॉवर्स उभारले जात असून सुमारे १३०० पेक्षा अधिक इमारतींवर मोबाईल टॉवर उभारले गेले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोबाईल टॉवर उभारताना आवश्यक असलेले अग्निशमन दलाचे नाहरकत प्रमाणपत्र, इमारतीचे अंकेक्षण आणि रहिवाशांची संमती यांसारख्या नियमांचे सर्रास उल्लंघन व बेकायदा कृती होत

असून महानगरपालिकेकडून या टॉवर्सचे सर्वेक्षणही केले जात नसल्याने व स्वतंत्र धोरण नसल्याने भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता असून शासकीय नियमावलींचे उल्लंघन केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या इमारतींवर मोबाईल टॉवर उभे करण्यात आले आहेत त्या कंपन्याकडून संबंधित इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट फी वसूल करणार काय तसेच संबंधित कंपन्याकडून थकीत देयके वसूल करण्यासाठी या कंपन्यांनी नियमित माहवारी पैसे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली,

(४) असल्यास, मोबाईल टॉवर उभे केल्यानंतर अनेक कंपन्या थकबाकी झाल्यामुळे नागरिकांकडून थकीत रक्कमा वसूल करण्याकरीता नागरीकांमध्ये इमारतीच्या सोसायटयांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून ज्या इमारतीवर मोबाईल टॉवर उभे करण्यात आले त्या कंपन्याकडून संबंधित इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट, फी वसूल करुन संबंधित कंपन्याकडून थकीत देयके वसूल करण्यासाठी या कंपन्यांनी नियमित माहवारी पैसे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, मोबाईल टॉवर्सच्या उभारणीबाबत ठोस धोरण निश्चित करून नियमावलीत आवश्यक ती सुधारणा करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

नागपूर शहरातील अधिकृत मोबाईल टॉवरची संख्या ४३१ असून अनधिकृत मोबाईल टॉवरची संख्या ४३१ आहे. असे एकूण ८६२ मोबाईल टॉवर शहरात उभारण्यात आले आहेत.

(२), (३), (४) व (५) हे खरे नाही.

राज्यातील सर्व महानगरपालिका/ नगरपालिका /नगरपंचायतीमध्ये केंद्र शासनाचा दुरसंचार अधिनियम, २०२३ दिनांक २६/०६/२०२४ पासून व दूरसंचार नियम, २०२४ दिनांक ०१/०१/२०२५ पासून लागू करण्यात आला आहे. नागपूर महानगरपालिकेच्या हद्दीतील एकूण १० क्षेत्रिय कार्यालयांना महानगरपालिकेच्या नगर रचना विभागातर्फे दिनांक १७/०३/२०२६ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या सूचनांनुसार महानगरपालिकेच्या हद्दीतील अधिकृत व अनधिकृत मोबाईल टॉवरचे सर्वेक्षण करण्यात येत आहे.

अनधिकृत मोबाईल टॉवर्सवर कारवाई करण्यासंदर्भात नगर परिषद प्रशासन संचालनालय यांच्या दिनांक २१/०१/२०२६ च्या पत्रान्वये दूरसंचार अधिनियम २०२३ चे कलम १४(३), १४ (४) व कलम ५२ (२) नूसार सर्व महानगरपालिका, नगरपालिका व नगर पंचायतींना मालमत्ता कर, शास्ती/दंड व व्याज आकारण्याच्या नोटीसा मागे घेण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. तसेच कोणतीही दडपशाहीची कारवाई करण्यापूर्वी प्रधान सचिव (माहिती व तंत्रज्ञान) यांची पूर्वपरवानगी घेण्याबाबत व दूरसंचार अधिनियम, २०२३ चे काटेकोर पालन करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. सदर सूचनांनुसार कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात येते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील बाणेर येथील आर.डी.देशपांडे डेव्हलपर्स प्रा.लि. यांस महारेराने दिलेल्या आदेशाबाबत

**(५१)** * **९०५२ श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील बाणेर येथील आर. डी. देशपांडे डेव्हलपर्स प्रा. लि. (RD Deshpande Developers Pvt. Ltd.) च्या 'ईएल-होम्स' (EL-Homes) प्रकल्पातील घरखरेदीदारानी सदनिकेचा वेळेत ताबा न मिळणे, निकृष्ट बांधकाम, आश्वासित सुविधांचा अभाव आणि सदोष फिटिंगबाबत महाराष्ट्र स्थावर मालमत्ता नियामक प्राधिकरणाकडे (महारेरा) तक्रार केली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रार अंशतः मान्य करत बाणेर येथील आर.डी.देशपांडे डेव्हेलपर्स प्रा.लि. यांना ६० दिवसांच्या आत बांधकामातील त्रुटी दूर करणे, औपचारिक ताबापत्र देणे आणि प्रकल्पातील प्रलंबित सुविधा पुरविण्याचे निर्देश दिले असून खटल्याचा खर्च म्हणून २० हजार रुपयांच्या भरपाईचा आदेश देण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्व बांधकामातील त्रुटी (गळती, निकृष्ट फरशी, ड्रेनेज समस्या) दूर करुन औपचारिक ताबापत्र (Possession Letter) देऊन प्रकल्पातील प्रलंबित सुविधा पूर्ण करण्याच्या निर्देशाचे सदर विकासकाने पालन करावे यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) 'ईएल-होम्स' (EL-Homes) प्रकल्पातील घरखरेदीदाराने आर. डी. देशपांडे डेव्हलपर्स प्रा. लि. यांच्याविरुध्द दिनांक ०१/०८/२०२५ रोजी महारेरा पोर्टलवर तक्रार दाखल केली होती.

(२) व (३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने महारेरा प्राधिकरणाने दिनांक ०९/०४/२०२६ रोजी सुनावणी घेऊन आदेश पारित केले आहेत.

प्राधिकरणाने दिलेल्या आदेशाचे किंवा निर्देशांचे अनुपालन विकासकाने आदेशातील नमूद कालावधीत केले नाही तर अशा कालावधीनंतरच्या प्रत्येक दिवसासाठी विकासक स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ मधील कलम ६३ तरतूदीनुसार दंडास पात्र आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमातील सन १९८४ पासूनच्या रोजंदारीवरील चालक व वाहकांना कायम करण्याबाबत

**(५२)** * **१०४६५ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर महानगरपालिका परिवहन उपक्रमातील सन १९८४ पासूनच्या रोजंदारीवरील चालक व वाहकांना कायम करण्याच्या निर्णयाला आव्हान देणारी केएमटीची याचिका मा.उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचने फेटाळली असल्याचे दिनांक ११ मे, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर महानगरपालिका परिवहन उपक्रमातील अनेक वर्षे रोजंदारीवर काम करणाऱ्या चालक व वाहकांना सेवेत कायम करण्याचे आदेश देऊनही प्रशासकीय दिरंगाईमुळे प्रलंबित राहिलेल्या या निर्णयाची कठोर अंमलबजावणी करण्यासाठी न्यायालयाने किंवा संबंधित प्राधिकरणाने ८ आठवड्यांचा कालावधी निश्चित केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोल्हापूर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या वाहतूक विभागाकडील रिक्त असणाऱ्या चालक/वाहक पदांवर बदली प्रतीक्षा यादीवरील जेष्ठ व विनियमातील तरतुदीनुसार पात्र ठरणाऱ्या रोजंदारी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याच्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिली आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने या कर्मचाऱ्यांना तातडीने कायम करणे व जुनी रक्कम अदा करणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) परिवहन उपक्रमाच्या वाहतूक विभागाकडील एकूण २९ बदली कर्मचाऱ्यांनी त्यांना सेवेत कायम करण्याबाबत मा.औद्योगिक न्यायालयामध्ये दाखल केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने मा.न्यायालयाने त्यांना कायम करण्याचे आदेश दिले होते. सदर आदेशाविरुध्द महानगरपालिकेने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका दाखल केली. याप्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिनांक २७/०४/२०२६ रोजी मा.औद्योगिक न्यायालयाचा निर्णय कायम ठेवून सदर आदेशाची आठ आठवड्यात अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत.
(३) व (४) कोल्हापूर महानगरपालिकेने परिवहन उपक्रमाच्या वाहतूक विभागाकडील रोजंदारीवर कार्यरत ८० चालक व ८१ वाहक यांना रिक्त पदांवर सेवेत कायम करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला असून सदर प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगाव महानगरपालिकेच्या घनकचऱ्याचे वर्गीकरण न करताच परस्पर विल्हेवाट लावण्यात येत असल्याबाबत

**(५३) * १०१८५ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव महानगरपालिकेचा घनकचरा कंत्राटदाराकडून वर्गीकरण न करताच परस्पर विल्हेवाट लावली जात असल्याने पर्यावरणावर विपरीत परिणाम होत असल्याची बाब दिनांक २९ मार्च २०२६ रोजी व सुमारास मा.जिल्हाधिकारी यांच्या सर्वेक्षणातून निदर्शास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जळगांव शहरासाठी महत्वाकांक्षी असलेल्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाबाबत स्वच्छ शहर संकल्पनेतून निधी प्राप्त होऊनही प्रत्यक्ष बांधकामाची निविदा प्रक्रिया सुरु झाली नसून जळगाव शहरातून दिवसाला ११० ते ११५ टन कचरा निर्माण होत असतो परंतु, कचऱ्याचे व्यवस्थापन होत नसल्यामुळे कचऱ्याचे ढीग साठत असून शहरातील अनेक भागामध्ये कचरा टाकण्यात येतो त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जळगाव शहर हद्दीतील कचरा संकलनाचे काम संबंधित कंपनीकडून समाधानकारक होत नसल्याच्या तक्रारी नागरिकांकडून प्राप्त होत असून नियमानुसार घन कचरा व्यवस्थापन होत नसल्याने दोषी

कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

जळगाव शहर हद्दीत दैनंदिन निर्माण होणारा घनकचरा संकलनाचे काम बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे यांच्यामार्फत दिनांक ०१/०९/२०२५ पासून सुरू करण्यात आले असून महानगरपालिका हद्दीतील सर्व प्रकारच्या आस्थापनांमधून (रहिवासी, व्यावसायिक) तसेच रस्त्यावरील कचरा गोळा करण्यासाठी ८४ घंटागाड्या, ०९ कॉम्पॅक्टर, ०४ मिनी कॉम्पॅक्टर, ०६ टिप्पर, ०९ टाटा पिकअप, ०३ स्किप लोडर आणि ०४ ट्रॅक्टर अशा साधनसामग्रीसह ५०० कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. या कर्मचाऱ्यांच्या पर्यवेक्षणासाठी स्वतंत्र पर्यवेक्षक नियुक्त असून जी.पी.एस. सॉफ्टवेअरद्वारे दैनंदिन उपस्थिती आणि वाहनांचे ट्रॅकिंग करण्यात येते.

घनकचरा व्यवस्थापनासाठी शासनाने निर्धारित केलेल्या आव्हाणे शिवार गट नं. ८६४ या जागेवर दैनंदिन कचरा साठवला जातो. साठलेल्या कचऱ्यावर बायोमायनिंग प्रक्रियेद्वारे शास्त्रोक्त विल्हेवाट लावण्याचे काम टप्प्याटप्प्याने पूर्ण केले जात आहे. तसेच, घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाच्या बांधकामासाठी स्वच्छ भारत मिशन २.० अंतर्गत १८.०६ कोटी रुपयांच्या कामास दिनांक ०९/०४/२०२५ रोजी शासनाने मंजुरी दिली असून, दिनांक ०८/१२/२०२५ रोजी मे. रॉयन वेस्टर्न प्रोजेक्ट्स लि. एल.एल.पी., पुणे यांना कार्यादेश देण्यात आले असून सदर प्रकल्पाचे बांधकाम सुरू आहे. याव्यतिरिक्त, ८.९८ कोटी रुपये खर्चाच्या ३ मध्यवर्ती कचरा संकलन केंद्रांपैकी एका केंद्राचे ७०% बांधकाम पूर्ण झाले असून, उर्वरित २ ठिकाणी नागरिकांच्या विरोधामुळे विलंब झाला आहे.
(३) कचरा संकलनाच्या कामाचे महानगरपालिका कर्मचाऱ्यांमार्फत दैनंदिन पर्यवेक्षण करण्यात येत असून कामात अनियमितता आढळून आल्याने करारातील अटी-शर्तींचा भंग केल्याप्रकरणी, कंत्राटदार ‘बी.व्ही.जी. इंडिया लि.’ यांच्यावर दिनांक ३०/०५/२०२६ पर्यंत रुपये ५८,०३,५००/- इतकी दंडात्मक कारवाई करण्यात आली असून सदर दंड वसूल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सायन-पनवेल महामार्गावरील तुर्भे उड्डाणपुलाची दूरवस्था झाल्याबाबत

**(५४) * ९३५७ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सायन-पनवेल महामार्गावरील सानपाडा ते तुर्भे दरम्यान असलेल्या उड्डाणपूलाची दुरवस्था झाली असून मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून पुलाखाली बेघर लोकांची वस्ती, कचरा आणि अस्वच्छता पसरली असल्यामुळे प्रवाशांसाठी ही जागा असुरक्षित बनली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उड्डाणपुलाची नियमित दुरुस्ती करण्यात आली नसून गत पाच वर्षांत या उड्डाणपुलावर वारंवार अपघात होत असून सदर उड्डाणपुलाची तांत्रिक पाहणी (Structural Audit) करुन या उड्डाणपुलावरील खड्डे तातडीने बुजविणे तसेच कायमस्वरूपी दुरुस्ती/पुनर्बांधणी करण्याबाबत

कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) तुर्भे उड्डाणपुलाच्या मुंबई-पनवेल आर्म क्र.३ वरून वाहतूक सुरू असून वाहतूक सुरक्षित सुरू ठेवण्यासाठी उड्डाणपुलावरील खड्डे वेळोवेळी भरण्यात येत आहेत.

तुर्भे उड्डाणपुलाखालील अतिक्रमणाबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तुर्भे शाखा यांना वेळोवेळी अवगत करण्यात येत असून त्यांचेद्वारे सबंधितांवर कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(२) स्ट्रक्चरल ऑडिट अहवालामधील निष्कर्षानुसार तुर्भे उड्डाणपूलाचे पुनर्वसनाचे काम प्रगतीत आहे.

तुर्भे उड्डाणपुलावरील मागील ५ वर्षांतील अपघात हे रस्त्यावरील खड्डे, रस्ता सुरक्षेच्या साधना अभावी झाले नसल्याची नोंद आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल महानगरपालिका हद्दीत समाविष्ट ग्रामपंचायतीतील कर्मचाऱ्यांना नियमबाह्य पद्धतीने नियुक्त्या व पदोन्नती दिल्याबाबत

**(५५)** * **१०४१६ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या ग्रामपंचायतीतील कर्मचाऱ्यांचे शासन निर्णयानुसार अधिसंख्य पदांवर समावेशन करण्यात आले असून, अशा कर्मचाऱ्यांना नियमबाह्य पध्दतीने पदोन्नती व नियुक्त्या देण्यात आल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अधिसंख्य पदांवरील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देता येत नसतानाही पनवेल महानगरपालिकेकडून पदोन्नती देण्यात आली असून काही कर्मचाऱ्यांचे समावेशन आवश्यक तपासणी अहवाल, शैक्षणिक व तांत्रिक पात्रता पडताळणी आणि सक्षम प्राधिकरणाची मान्यता न घेता करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, माहिती अधिकारांतर्गत तपासणी अहवाल उपलब्ध नाही असे उत्तर देण्यात आले असताना समावेशन व नियुक्ती प्रक्रिया कोणत्या आधारावर करण्यात आली, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित अधिकारी, कर्मचारी व तत्कालीन प्रशासनाविरुध्द कोणती विभागीय/फौजदारी कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे, तसेच भविष्यात अशा प्रकारची पुनरावृत्ती टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत खरे आहे.

पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या ग्रामपंचायतीतील कर्मचाऱ्यांचे महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयानुसार अधिसंख्य पदांवर समावेशन करण्यात आले असल्याची बाब खरी आहे.

तथापि, सदर कर्मचाऱ्यांना नियमबाह्य पदोन्नती व नियुक्त्या देण्यात आले असल्याची बाब खरी नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.